MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष एकविसावे/अंक १/जानेवारी २०२०

## संपादकीय

### स्मरण एका गणित शिक्षकाचे

गणिताचा ठेवा भारतीयांना प्राचीनकाळापासून मिळालेला आहे. या देशात प्राचीन काळी कात्यायन, आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त, महावीर आचार्य, श्रीपती, भास्कराचार्य असे महान गणिती होऊन गेले. काही कारणाने १३ व्या शतकापासून भारताची महान अशी गणितीय परंपरा खंडित झाली. तथापि काही निवडक गणितज्ज्ञांनी ही परंपरा सुरू ठेवली. त्यामध्ये समावेश होतो तो माधव, निलकंठ सोमय्याजी, गणेश दैवज्ञ या गणितज्ज्ञांचा. श्रीनिवास रामानुजन हा या यादीतला तारा म्हणता येईल. १८८७ ते १९२० असा त्यांचा कालावधी होता. केवळ ३२ वर्षांच्या अल्पकाळात त्यांनी एवढे कार्य करून ठेवले की, त्यांच्या कार्याचा आवाका अजूनही गणितज्ज्ञांना पूर्णपणे समजलेला नाही. या यादीत विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात जन्मलेल्या एका मराठमोळ्या माणसाने आपले नाव पक्के केले आहे. ते नाव आहे दत्तात्रय रामचंद्र कापरेकर यांचे १७ जानेवारी १९०५ साली ठाणे जिल्ह्यातील डहाणू या गावी त्यांचा जन्म झाला. म्हणून जानेवारी महिन्याच्या दिशा अंकाचे संपादकीय या महान गणितज्ज्ञाचे स्मरण करण्यासाठी लिहिण्यात आलेला आहे.

दत्तात्रय रामचंद्र कापरेकर यांच्या बालपणी शिक्षणाच्या सुविधा तुटपुंज्या होत्या. त्यांनी आपले शालेय शिक्षण ठाण्यात राहून पूर्ण केले. त्यानंतर ते पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी गेले. १९२७ साली त्यांना रँगलर परांजपे गणित पदक मिळाले. पदवीधर झाल्यावर त्यांनी नाशिक शहराजवळ असलेल्या देवळाली या गावातील एका शाळेत गणित शिक्षकाची नोकरी पत्करली. सेवेतून निवृत्त झाल्यानंतर ते नाशिक शहरात राहू लागले. १९८६ साली वयाच्या ८१व्या वर्षी त्यांनी नाशिक शहरातच आपला शेवटचा श्वास घेतला. आमचे मित्र दिलीप गोटखिंडीकर यांना कापरेकरांचा जवळचा सहवास लाभला. त्यांच्याकडूनच मला कापरेकरांच्या महान कार्याची माहिती मिळाली.

'अंकांशी खेळ करणारा गणिती' असे कापरेकरांचे वर्णन करता येईल. गणितासारखा रूक्ष विषय शिकविण्याचे काम त्यांनी स्वीकारले. गणित हा कंटाळवाणा नसून मनोरंजन करणारा विषय आहे अशी त्यांची श्रद्धा होती. नैसर्गिक

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

संख्यांची आकडेमोड करून त्यांनी अनेक संख्यांचे विशिष्ट असे गुणधर्म शोधून काढले. त्यात ३९५ आणि ६१७४ हे दोन अंक त्यांच्यामुळे फारच प्रसिद्ध झाले. या अंकांना गणित विश्वात 'कापरेकर स्थिरांक' म्हणून ओळखले जाते. कापरेकर स्थिरांकाचे वैशिष्ट्य समजून घेणे महत्त्वाचे आहे.

प्रथम आपण तीन अंकी संख्येचा विचार करू या. ज्यातील तीनही अंक समान नाहीत अशा संख्या घ्या. समजा ती संख्या ३६९ आहे. यात ३, ६ आणि ९ असे तीन अंक आहेत. या तीन अंकाच्या मदतीने तयार होणारी सगळ्यात मोठी संख्या ९६३ होईल. याच तीन अंकांचा वापर करून मिळणारी लहानात लहान संख्या ३६९ होईल. आता मोठ्या संख्येतून लहान संख्या वजा करा. ९६३-३६९ = ५९४ अशी तीन अंकी संख्या मिळेल. यात ५, ९ आणि ४ असे अंक आहेत. या अंकापासून मिळणारी मोठी आणि लहान संख्या अनुक्रमे ९५४ आणि ४५९ अशा होतील. आता मोठी संख्या ९५४ मधून लहान संख्या ४५९ वजा करा. ९५४ -४५९ =३९५ मिळते. यालाच 'कापरेकर स्थिरांक' म्हणतात.

आता आपण चार अंकी संख्येचा विचार करू. ज्यातील चारही अंक समान नाहीत अशी एक चार अंकी संख्या घ्या. उदाहरणादाखल आपण ६१७४ ही संख्या घेऊ या. या संख्येत ६, १, ७ आणि ४ असे चार अंक आहेत. हे अंक वापरून आपण मोठ्यात मोठी संख्या ७६४१ मिळवू शकतो. त्याचबरोबर हे अंक वापरून आपण १४६७ अशी लहानात लहान संख्या मिळवू शकतो. आता मोठ्या संख्येतून लहान संख्या वजा करा. म्हणजे ७६४१-१४६७=६१७४ असे उत्तर मिळते. ६१७४ या संख्येला देखील 'कापरेकर स्थिरांक' असेच म्हणतात.

वरच्या उदाहरणात केवळ एका पायरीत आपण कापरेकर स्थिरांकापर्यंत पोहोचलो. प्रत्येकवेळी असे होईलच असे नाही. या स्थिरांकापर्यंत पोहोचण्यासाठी अनेक पायऱ्यांतून जावे लागते. उदाहरणादाखल ३६९९ ही संख्या घ्या.

पायरी १ : ९९३६- ३६९९ = ६२६४

पायरी २ : ६६४२-२४६६ = ४१७६

पायरी ३ : ७६४१-१४६७ = ६१७४

कापरेकरांनी वर्ग संख्यांमधील मजेशीर गुणधर्म शोधून काढले. उदाहरणादाखल ९ ही संख्या घेऊ.९ चावर्ग केला की ८१ मिळते. यात ८ आणि १ असे दोन अंक आहेत. त्यांची बेरीज केली की मूळ संख्या ९ मिळते. आता ४५ ही संख्या घ्या.४५ चा वर्ग केल्यास २०२५ ही संख्या मिळते. यातील २० आणि २५ या संख्यांची बेरीज केली की मूळ संख्या ४५ मिळते. हाच नियम ७७७७ या चार अंकी संख्येलादेखील लागू पडतो. अशा वैविध्यपूर्ण संख्यांना 'कापरेकर संख्या' असे म्हणतात.

वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म दाखविणारे अनेक अंक त्यांनी शोधून काढले. या एका गटाला त्यांनी 'हर्षद अंक' असे नाव दिले. हर्षद याचा अर्थ आनंद देणाऱ्या संख्या. या अंकाचे वैशिष्ट्य असे की, ते त्यातील अंकाच्या बेरजेने भागले तरी निशेष भाग जातो. उदाहरणार्थ १२ ही संख्या घ्या. यात १ आणि २ असे दोन अंक आहेत. ह्या संख्येला १+२=३ या अंकाने निशेष भाग जातो.

कापरेकरांनी नैसर्गिक संख्यांचे अनेक मनोरंजक गुणधर्म शोधून काढले. या गुणधर्मांचा ते आपल्या

(पृष्ठ क्र. ३ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष एकविसावे/अंक ७/जानेवारी २०२०

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २४ वे/अंक ७ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | सातवाहनकालीन भारत | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ३ |
| ३) | दर्शन सूर्याच्या कंकणाचे | श्री. राजेंद्र कवठेकर<br>डॉ. सुधाकर आगरकर | १६ |
| ४) | समांतर चित्रपटाची ५० वर्षे | डॉ. निरंजन कुलकर्णी | १८ |
| ५) | सावरकरांचा माफीनामा : समज आणि वास्तव | श्री. संकेत कुलकर्णी | २१ |
| ६) | शैक्षणिक सहल : जपान | विजया खरे | २३ |
| ७) | भारतीय पुरातत्त्वविद्या आणि भाषाशास्त्र पार्श्वभूमी व युरोभारतीय आर्य पूर्वज – सिद्धान्त – प्रवाद | डॉ. प्रभाकर आपटे | ३० |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# सातवाहनकालीन भारत

*प्राचीन काळात दख्खन व महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या सातवाहन राजघराण्याविषयी माहिती देणारा लेख – संपादक*

प्राचीन भारतातील महत्त्वाच्या राजघराण्यांपैकी सातवाहन राजघराणे हे एक राजघराणे होय. सातवाहनांनी इसवी सनापूर्वीच्या काळात भारतात मोठ्या साम्राज्याची स्थापना केली होती. इतिहासकारांच्या मते, कण्व राजघराण्यानंतर मोठे साम्राज्य स्थापन करणारे व इतिहासात सुप्रसिद्ध असलेले प्राचीन कालीन राजघराणे म्हणजे सातवाहन राजघराणे होय. शुंग व कण्वांप्रमाणे सातवाहन देखील ब्राह्मण राजवंश होता.

सातवाहन मुळचे कुठले याविषयी वेगवेगळे मतप्रवाह आढळतात. काही अभ्यासक ते मूलतः आंध्रामधील (आंध्र प्रदेश) होते असे म्हणतात. तर काहींच्या मते ते मुळचे महाराष्ट्रातील होते. मात्र, सद्यस्थितीत बहुतेक इतिहासकारांचे एकमत आहे की, सातवाहन हे मुळचे महाराष्ट्रातीलच होते व त्यांची राजधानी 'प्रतिष्ठान' होती. 'प्रतिष्ठान' म्हणजे महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील औरंगाबाद जिल्ह्यातील 'पैठण' हे गाव होय. आता हे सर्वमान्य झाले आहे की, सध्याचे 'पैठण' म्हणजेच प्राचीन कालीन 'प्रतिष्ठान' होय. काही इतिहासकारांच्या मते सध्याच्या आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम् हे ठिकाण म्हणजे सातवाहनांची राजधानी होती. परंतु, अगोदर म्हटल्याप्रमाणे बहुतांश इतिहासकारांचे मत आहे की, सातवाहन मुळचे महाराष्ट्रातीलच होते व 'प्रतिष्ठान' ही त्यांची राजधानी होती व सातवाहनांनी नंतरच्या काळात आंध्र देश (तेलंगणा व आंध्र प्रदेश) देखील जिंकला होता. सातवाहन आंध्र प्रदेशातील जनतेमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात मिसळले व त्यांच्याशी जिव्हाळा निर्माण केला की, पुराणांमध्ये त्यांचा उल्लेख आंध्र देशाचे राजे वा आंध्र राजे असा आलेला आहे असे अभ्यासकांचे मत आहे. यावरून आपण असे म्हणणे वावगे ठरू नये की, सध्याचा महाराष्ट्र, तेलंगणा व आंध्र प्रदेश हे भाग सातवाहनांच्या साम्राज्याचा घटक वा हिस्सा होते.

सातवाहनांची वंशावळ, या वंशाचा संस्थापक, तसेच त्यांचा नेमका कालावधी याबाबतदेखील विविध स्रोतांतून वेगवेगळी माहिती मिळते. मात्र, डॉ. रे चौधरींसारख्या इतिहासकाराच्या मते सिमुक (शिशुक) नामक राजा हा सातवाहन राजवंशाचा संस्थापक होता. पुराणांमध्ये सिमुकचा उल्लेख सिसुक (शिशुक), सिधुक तसेच सिप्रक असा आलेला आहे. परंतु महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांच्यामते सातवाहन नामक पुरुषच या वंशाचा मूळपुरुष असावा. येथे उल्लेख केलेला शिमुक याचा काळ इसवी सनपूर्व पहिले शतक असावे असे काही अभ्यासकांचे मत आहे. सातवाहनांविषयी व प्रामुख्याने त्यांचा मूळपुरुष, आरंभकाल तसेच त्यांचा वर्ण याविषयी आपणास विविध स्रोतांतून वेगवेगळी माहिती मिळते हे यावरून सिद्ध होते. आपण पाहिलेच की, काही अभ्यासक शिमुक हा या राजघराण्याचा संस्थापक असावा तर काहींना सातवाहन नामक पुरुषच या राजघराण्याचा मूळपुरुष आहे असे वाटते. त्याचप्रमाणे हे घराणे आंध्रदेशीय की महाराष्ट्रातले व वर्णाने ब्राह्मण, क्षत्रिय की शूद्र यावरूनदेखील अभ्यासकांमध्ये वेगवेगळी मते आहेत. परंतु आजमितीस तरी बहुसंख्य इतिहासकार सातवाहन हे मुळचे महाराष्ट्रातले व वर्णाने ब्राह्मण होते

जो सत्काराने हरखून जात नाही व अपमानाने रागवत नाही तो सज्जन जाणावा.

असे मानतात. रे चौधरी यांच्यामते सातवाहन घराण्यात एकूण एकोणीस राजे होऊन गेले व या राजवंशाने जवळपास तीनशे वर्ष राज्य केले. काही इतिहासकारांच्या मते सातवाहनांनी जवळ-जवळ चारशे साठ वर्षे राज्य केले.

आपणास सातवाहनांविषयीची माहिती नाशिक येथील शिलालेखावरून जशी मिळते त्याचप्रमाणे जुन्नर येथील नाणेघाटातील शिलालेखावरूनदेखील मिळते. नाणेघाटामध्ये शिलालेखांसोबतच सातवाहन वंशातील काही राजांच्या प्रतिमादेखील कोरलेल्या आढळतात. येथील सातवाहन कालीन प्रतिमांचे वैशिष्ट्य म्हणजे तत्सम प्रतिमा कुणाच्या आहेत याची नावे देखील देण्यात आली आहेत. उदाहरणार्थ, एका प्रतिमेखाली सिमुक सातवाहनो असे नाव कोरण्यात आले आहे. तज्ज्ञांच्या मते हे नाव त्याकाळच्या प्राकृत भाषेत कोरलेले आहे. आपण पाहिलेलेच आहे की, सिमुक हा सातवाहनांचा महत्त्वाचा राजा होता व ही भग्न प्रतिमा सिमुकाचीच होती हे यावरून लक्षात येते.

शिमुकाने (श्रीमुख) साधारणतः इसवी सनपूर्व २३५ ते इसवीसनपूर्व २१२ या कालावधीत तेवीस वर्षे राज्य केले असे अभ्यासकांचे मत आहे. जैन परंपरेतील माहितीनुसार शिमुकाने जैन मंदिरे, तसेच बौद्ध धर्मीय वास्तुंचे निर्माण केले होते. परंतु त्याच्या कारकीर्दीच्या शेवटच्या काळात तो दुष्टपणाने वागू लागला व त्यामुळे त्याची हत्या झाली.

शिमुकानंतर त्याचा लहान भाऊ कान्हा वा कृष्ण हा राजा बनला व त्याने इसवीसनपूर्व २१२ ने इसवी सनपूर्व १९५ या कालावधीत अठरा वर्षे राज्य केले. कृष्णाने आपल्या काळात अनेक प्रदेश जिंकून सातवाहनांच्या साम्राज्याचा पश्चिमेकडे नाशिकपर्यंत प्रसार केला. कान्हा वा कृष्णानंतर पहिला (प्रथम) सातकर्णी हा सातवाहन राजा बनला. पुराणांनुसार पहिला सातकर्णी हा कान्हाचा पुत्र होता तर काही अभ्यासकांच्या मते तो शिमुकचा पुत्र होता. पहिल्या सातकर्णीने अवघी दोन वर्षेच राज्य केले. पहिल्या सातकर्णीने पश्चिम माळवा, नर्मदेचे खोरे, तसेच विदर्भाचा भाग जिंकल्याची माहिती आपणास मिळते. पहिल्या सातकर्णीने दोन अश्वमेध तर एक राजसुय यज्ञ केला होता. तसेच त्याने 'दक्षिणपथपती' व 'अपरातीहतचक्र' या उपाध्या घेतल्या होत्या. विविध यज्ञ केल्यानंतर पहिला सातकर्णी मोठ्या प्रमाणात दक्षिणा व दान देत असे. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास त्याने ४२,७०० गायी, १० हत्ती, १००० अश्व, १७ चांदीची ताटे, १ रथ व ६८,००० हजार कर्शपन (नाणी) दक्षिणा म्हणून दिली होती अशी माहिती आपणास मिळते. यावरून असे निदर्शनास येते की, पहिल्या सातकर्णीच्या काळात राज्यात समृद्धी व सुबत्ता असावी. अभ्यासकांचे असे मत आहे की, पहिल्या सातकर्णीचा मृत्यू रणांगणांवर झाला असावा.

पहिल्या सातकर्णीनंतर त्याचे दोन अल्पवयीन पुत्र गादीवर आले. या दोन राजपुत्रांची नावे वेदीश्री व सतीश्री अशी होती. या राजपुत्रांचे वय लहान असल्याने राज्यकारभार त्यांची माता (राजमाता) नयनिका हिने चालविल्याचे दाखले आपणास सापडतात. नयनिका राणीस राज्यशासन हाकण्यात तिच्या वडिलांनीदेखील मदत केली असावी असे मत मांडले जाते. असे म्हटले जाते की, वेदीश्रीचे अल्पवयातच निधन झाले. त्यामुळे सतीश्री हा पुढचा सातवाहन राजा झाला असावा असे अभ्यासकांचे मत आहे. मात्र, प्राचीन भारताचा इतिहास अभ्यास करताना जी नेहमीच अडचण येते ती म्हणजे आपणास अनेक राजवंशांच्या वंशावळीची व तत्सम घराण्यातील राजांची सर्व नावे बऱ्याचदा मिळत नाहीत. त्यामुळे पहिल्या सातकर्णी नंतर व वेदिश्रीच्या मृत्यूपश्यात कोणता राजा सातवाहनांच्या गादीवर आला हे ठरविणे देखील अभ्यासकांना कठीण जाते. याचे कारण आपण पाहिले की, एक मत प्रवाह असा आहे की, वेदीश्रीनंतर

सतीश्री हा राजा बनला असावा, परंतु पुराणांनुसार पहिल्या सातकर्णीनंतर पुर्णोत्संग हा सातवाहन सम्राट बनला अशी माहिती आपणास मिळते. त्यामुळे सामान्य वाचकाच्या मनात संभ्रमाची स्थिती निर्माण होते. परंतु अभ्यासकांच्या मते एक गोष्ट मात्र नक्की आहे व ती ही की, सातवाहनांच्या या चौथ्या राजाच्या कारकीर्दीतच उत्तरेत पुष्यमित्र शुंगाने मौर्यांची राजसत्ता संपुष्टात आणली. पुष्यमित्र शुंग हा शेवटचा मौर्य सम्राट बृहद्रथ याचा सेनापती होता. आपणास इतिहासात अशी माहिती मिळते की, त्याने सैन्याच्या कवायतीचे आयोजन करून सदर कवायतप्रसंगी आपला सम्राट बृहद्रथ यास बोलाविले व त्याची हत्या करून स्वतःस राजा घोषीत केले. अशाप्रकारे उत्तर भारतात मौर्यांची सत्ता संतुष्टात येऊन मगध साम्राज्यात शुंग राजवंशाची स्थापना झाली. शुंग हे वर्णाने ब्राह्मण होते. सातवाहन हे देखील ब्राह्मण राजेच होते. हा इतिहासातील एक योगायोग मानावा लागेल. असो. पुराणांनुसार स्कंदस्तंभी हा राजगादीवर आलेला सातवाहनांचा पाचवा राजा होय.

वेदीश्री, सतीश्री ते स्कंदस्तंभी या राजांच्या कारकिर्दी व कालखंडाविषयी अभ्यासकांत वेगवेगळे मतप्रवाह असल्याचे आपण पाहिलेच आहे. काही तज्ज्ञांच्या मते तर स्कंदस्तंभी हे नाव देखील कल्पनातीतच असावे. त्यामुळे आपणास पहिल्या सातकर्णीनंतर ज्या सातवाहन राजाविषयी बऱ्यापैकी माहिती मिळत असेल तो राजा म्हणजे दुसरा सातकर्णी हा होय. दुसऱ्या सातकर्णीने इसवी सनपूर्व १६६ ते इसवी सनपूर्व १११ या कालावधीत राज्य केले. खारवेलाच्या हातीगुंफा शिलालेखात उल्लेखिलेला दुसरा सातकर्णी राजा तो हाच असावा असे अभ्यासकांचे मत आहे. खारवेल हा प्राचीन भारतातील अतिशय प्रसिद्ध असा शूरवीर राजा होता. त्याचे राज्य कलिंग (सद्याचा ओडीशा) प्रदेशावर होते. असो. दुसऱ्या सातकर्णीच्या काळात सातवाहनांनी पूर्व माळव्याचा प्रदेश जिंकला असावा असे काही अभ्यासकांचे मत आहे. पुराणांनुसार दुसऱ्या सातकर्णीनंतर लंबोदार हा सातवाहन सम्राट बनला व लंबोदरानंतर त्याचा पुत्र अपीलक हा गादीवर आला. लंबोदर व अपीलकानंतर गादीवर आलेला महत्त्वाचा सातवाहन सम्राट म्हणजे कुंतल सातकर्णी हा होय. सातवाहन राजांनी आपल्या कालावधीत महाराष्ट्री प्राकृत भाषेला अनन्यसाधारण महत्त्व दिल्याचे आता सिद्ध झाले आहे. कुंतल सातवाहन या नृपतीने देखील आपल्या अंतःपुरातील स्त्रियांनी प्राकृत भाषेचाच प्रयोग करावा अशा सूचना दिल्याची माहिती आपणास मिळते.

कुंतल सातकर्णीनंतर ज्या महत्त्वाच्या सातवाहन राजाविषयी माहिती मिळते तो म्हणजे हाल हा राजा होय. हा सातवाहन कुळातील सतरावा राजा होता व त्याने इसवी सन २० ते इसवी सन २४ या कालावधीत राज्य केल्याची माहिती आपणास मिळते. हाल राजा हा महाराष्ट्रीय प्राकृत भाषेतील कवी होता असे अभ्यासकांचे मत आहे. त्याने प्राकृत भाषेत 'गाथासप्तशती' (गाथासत्तसई) हा ग्रंथ संपादीत केला होता. या ग्रंथाचे संकलन त्याने इसवीसनाच्या पहिल्या शतकात केले होते. गाथासप्तशतीमध्ये हाल राजाने प्राकृत भाषेतील गाथा व सुभाषिते संग्रहीत केली होती. हा एक काव्यग्रंथ आहे. गाथासत्तसई वा गाथासप्तशतीमध्ये गोदावरी तसेच सह्याद्रीचा संदर्भ येतो व या ग्रंथावरून तत्कालीन महाराष्ट्राच्या जनजीवनाची व प्रामुख्याने ग्रामीण जीवनाची प्रचीती येते यात वाद नाही. हाल राजाचा उल्लेख गाथासप्तशती सोबतच पुराणे, लीलावती, अभिधान चिंतामणी, तसेच देशीनाममाला आदी ग्रंथांमध्ये येतो. अभ्यासकांच्या मते पैशाची भाषेचा तज्ज्ञ व विद्वान गुणाढ्य हा हाल राजाचा समकालीन असावा. पैशाची ही एक प्राचीन काळातील प्राकृत भाषाच होती व ती प्रामुख्याने वायव्य भारतात बोलली जात असे असा अंदाज व्यक्त केला जातो. या भाषेला 'भूतांची, राक्षसांची असंस्कृत भाषा' वा 'व्याकरणकारांनी वर्णन

केलेली प्राकृत भाषा' म्हटले जात असे अशाप्रकारचे मत काही अभ्यासक व्यक्त करतात. प्राकृत भाषेच्या व्याकरणात पैशाचीचे वर्णन व त्या भाषेतील काही ओळी देखील आल्याचे दाखले आपणास आढळतात. आपणास अशी माहिती मिळते की, तेराव्या शतकातील 'हम्मीरमदमर्दन' व 'मोहराजपराजय' या नाटकांतील काही पात्रे एक विशिष्ट प्रकारची पैशाची भाषा बोलत असतात. साधारणतः दोन हजार वर्षांपूर्वी पैशाची भाषा समाजात प्रचलित असावी असे म्हटले जाते. संस्कृत मधील काही शब्दांचा उच्चार पैशाचीत कसा होत असे हे पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल, संस्कृत शब्द – 'दामोदर' पैशाचीत – 'तामोतर', संस्कृत शब्द – 'नगर' – पैशाचीत – 'नकर', संस्कृत शब्द – 'राजा' – पैशाचीत – राचा, संस्कृत शब्द – 'धर्म' – पैशाचीत – 'खम्म', संस्कृत शब्द – 'कन्दर्प' – पैशाचीत – 'कंतप्प'. तसेच पैशाचीत 'ण' चा 'न' होतो, 'ल' चा 'ळ' होतो व 'टु' ऐवजी 'तु' लिहिला जातो. पैशाचीतील साहित्याविषयी म्हटले तर, अभ्यासकांचे मत आहे की, सद्यस्थितीत या भाषेतील ग्रंथ उपलब्ध नाहीत. त्याचप्रमाणे गुणाढ्याने पैशाचीत 'बड्डकहा' (बृहत्कथा) हा ग्रंथ रचला परंतु तोही आज उपलब्ध नाही. मात्र आपणास उदयोतनसूरी याने महाराष्ट्री प्राकृतात लिहिलेल्या कुवलयमाला या चंपूकाव्यात पैशाची भाषेचा काही प्रमाणात वापर केलेला असल्याचे निदर्शनास येते. त्याचप्रमाणे अगोदर उल्लेखिलेल्या तेराव्या शतकातील 'हम्मीरमदमर्दन' व 'मोहराजपराजय' या संस्कृत नाटकांतील निवडक पात्रे पैशाचीची एक पोटभाषा चूलिका पैशाचीचा वापर करताना दिसतात. बाराव्या शतकातील हेमचंद्र याने लिहिलेल्या 'कुमारपालचरित' या संस्कृत काव्यात व प्राकृत व्याकरणग्रंथामध्ये पैशाची व चूलिका पैशाचीतील गाथा सापडतात. या गाथा अतिशय सुंदर असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. जैन धर्मियांच्या काही ग्रंथांमध्येदेखील पैशाची व चूलिका पैशाचीतील काही रचना आढळतात. येथे गुणाढ्याचा उल्लेख आला आहे तर त्याच्याविषयी जास्त माहिती घेणे संयुक्तिक ठरेल. असे म्हटले जाते की, गुणाढ्य हा सातवाहन राजाचा प्रधान होता. त्याच्याविषयीची एक अख्यायिका अशी आहे की, पैठण शहरात सोमशर्मा नावाचा एक ब्राह्मण होता व त्याला एक कन्या होती, तिचे नाव श्रुतार्था असे होते. सोमशर्माच्या मृत्युपश्यात श्रुतार्थचे पालनपोषण तिच्या भावांनी केले. श्रुतार्थाने मोठी झाल्यावर कीर्तिसेन नामक एका नागासोबत (नागवंशीय व्यक्तीसोबत) गंधर्व विवाह केला. प्राचीनकाळी एकंदरीत आठ प्रकारचे विवाह प्रकार अस्तित्वात होते असे अभ्यासक म्हणतात. यापैकी एक प्रकार म्हणजे 'गंधर्व विवाह' हा होय. हा एक प्रकारचा प्रेमविवाह होता. एखादी तरुण व तरुणी एकमेकांकडे आकर्षित होऊन स्वमर्जीने जेव्हा पती–पत्नीसारखे एकत्र राहत असत वा जीवन व्यतीत करीत असत तेव्हा त्यांचा गंधर्व विवाह झाला असे म्हटले जात असे. या विवाहात कुठलाही धार्मिक विधी होत नसे व कुटुंबातील व्यक्ती उपस्थित नसत. दुष्यंत व शकुंतलेचा गंधर्व विवाह झाला होता अशी माहिती पौराणिक कथेमध्ये तसेच महाभारतात मिळते. तर श्रुतार्थाने गंधर्व विवाह केला व तिला जो पुत्र झाला तो म्हणजे गुणाढ्य होय अशी कथा आहे. आपल्या मातेच्या मृत्युपश्चात गुणाढ्य दक्षिणापथात जाऊन संस्कृत व प्राकृत भाषांचा अभ्यास करुन या भाषांतील विद्वान व पंडीत बनून पैठणला परत आला. तत्कालीन सातवाहन राजाला या भाषांमध्ये गती नव्हती वा तो अविद्य होता. त्यामुळे त्याच्या राणीने त्याचा उपहास केला व राजाने व्याकरण शिकावयाचे ठरविले. त्यावेळी गुणाढ्य सातवाहन राजाच्या दरबारात होता. राजाने गुणाढ्याला विचारले की, त्याला शिकून सुविद्य बनण्यास किती कालावधी लागेल. तेव्हा गुणाढ्याने राजाला विद्या प्राप्त करण्यास एकंदरीत सहा वर्षांचा कालावधी लागेल

असे उत्तर दिले. परंतु सातवाहन राजाच्या दरबारातील दुसरा एक पंडीत शर्मवर्मा याने राजाला आपले शिक्षण पूर्ण करण्यास सहा महिन्याचा अवधी लागेल असे मत मांडले व शर्मवर्मा राजाला या कालावधीत सुविद्य करेल असे म्हटले. गुणाढ्य, शर्मवर्माच्या मताशी असहमत होता. गुणाढ्याने शर्मवर्म्याला सांगितले की, जर त्याने राजाला सहा महिन्यात सुविद्य करून दाखविले तर तो म्हणजेच गुणाढ्य संस्कृत व प्राकृत भाषा उच्चारणे सोडून देईल. शर्मवर्म्याने दिलेल्या वचनाप्रमाणे सातवाहन राजाला विद्यादान करून सुविद्य करून दाखविले व गुणाढ्य एकप्रकारे पैज हरला. यासर्व प्रकारामुळे गुणाढ्याला अपमानीत वाटले व त्याने संस्कृत व प्राकृत भाषा उच्चारणे तर बंदच केले परंतु तो पैठण हे शहर सोडून देऊन विंध्यारण्यात निघून गेला. विंध्यारण्यात त्याने पैशाची भाषा अवगत केली. येथेच गुणाढ्याला काणभूती नावाचा पिशाच भेटला व त्याने गुणाढ्याला सात विद्याधरांच्या कथा सांगितल्या. गुणाढ्याने विद्याधरांच्या या कथा आपल्या रक्ताने सात भागात लिहून काढल्या व त्याचे हेच लिखाण पुढे चालून 'बृहत्कथा' या नावाने प्रसिद्ध पावले. गुणाढ्याला वाटले की, त्याच्या या कथा पैशाचीत असल्याने विद्याधर त्या चोरुन नेतील. परंतु त्याला माहीत होते की, विद्याधर रक्ताला स्पर्श करणार नाहीत त्यामुळे गुणाढ्याने या कथा आपल्या रक्ताने लिहून काढल्या. गुणाढ्य कालांतराने 'बृहत्कथेचे' बाड घेऊन पैठण नगरीत परत आला व त्याने आपल्या शिष्यांकरवी त्या कथा सातवाहन राजाकडे पाठवून दिल्या. गुणाढ्य स्वतः मात्र नगराबाहेरच बसून राहिला. सातवाहन राजाला मात्र, आपल्या विद्येचा अभिमान झाला होता. त्यामुळे त्याने गुणाढ्याच्या शिष्यांचा व 'बृहत्कथांचा' देखील अपमान केला. त्यामुळे गुणाढ्याला अतोनात दुःख झाले. शेवटी गुणाढ्याने 'बृहत्कथा' (बृहत्कथा) ग्रंथ अग्नीत भस्म करून टाकण्याचे ठरविले. यासाठी त्याने अग्नी निर्माण केला व शेकोटी पेटवली. यानंतर गुणाढ्याने ग्रंथाचे एकेक पान वाचण्याचा व ते वाचून झाल्यावर शेकोटीत टाकून जाळण्याचा सपाटा लावला. गुणाढ्य या कथा मोठ्याने वाचत असल्यामुळे वनातील पशुपक्षी त्या कथांकडे आकर्षित झाले व ते आपले खाणेपिणे विसरून गुणाढ्याच्या बृहत्कथा ऐकू लागले. गुणाढ्य अशातऱ्हेने 'बृहत्कथा' जाळून टाकत असताना सातवाहन राजाला एक विचित्र विकार वा आजार जडला. राजाला या आजारातून बरे होण्यासाठी त्याने सुकून गेलेले मात्र ताजे असे मांस भक्षण करावे असे वैद्यांनी सांगितले. त्यानुसार अशा मांसाचा शोध घेत असताना लक्षात आले की, गुणाढ्य आपल्या पैशाचीतील कथांचे मोठ्याने वाचन करून जाळत आहे व या कथा ऐकण्यासाठी रानावनातील पशुपक्षी अन्न-पाणी सोडून बसले आहेत. त्यामुळे ते जीवंत असतानाच त्यांचे मांस सुकून गेले आहे. हे विदारक चित्र पाहून सातवाहन राजाला वाईट वाटले व आपण गुणाढ्याचा व त्याच्या बृहतकथांचा अपमान करून मोठी चूक केली आहे हे त्याच्या लक्षात आले. त्यामुळे राजा गुणाढ्याकडे गेला व त्याने गुणाढ्याला आपल्या कथांचे दहन थांबविण्याची विनंती केली. परंतु तोपर्यंत फार उशीर झाला होता. राजाने विनंती केल्यामुळे गुणाढ्याने बृहत्कथांचे दहन थांबविले व शेवटची वा अखेरची नरवाहन दत्तची कथा राजाला सूपूर्त केली व प्राण त्याग केला. पैशाची ही भाषा याज्ञिकांची नसल्यामुळे व 'बृहत्कथा' हा ग्रंथ आर्यावर्ताच्या बाहेर रचलेला असल्यामुळे तसेच यात यज्ञविद्येचा उपहास करणाऱ्या विद्याधर तसेच पिशाच इत्यादींच्या कथांचा समावेश असल्यामुळे संस्कृत पंडितांनी पिशाचीचा व बहत्कथांचा अनादर केल्याचे मत काही विद्वानांनी व्यक्त केले आहे. असो. हाल राजा हा एक उत्तम कवी होता व त्याने महाराष्ट्री प्राकृतमध्ये गाथासत्तसई (गाथासप्तशी) या काव्यग्रंथाचे संकलन केले होते. या ग्रंथात प्राकृत भाषेतील जवळ-

जवळ सातशे गथा संकलीत करण्यात आल्या होत्या व त्या वेगवेगळ्या रसातील गाथा आहेत. या ग्रंथातील गाथा प्रामुख्याने शृंगारप्रधान आहेत. हाल राजाचा उल्लेख संस्कृत व प्राकृत ग्रंथांमध्ये एक धर्मात्मा, दानशूर, लोकांचे हित जपणारा व विद्याप्रेमी असा येतो असे अभ्यासक म्हणतात. गाथासप्तशतीवरून हालाची एक रसिक, काव्यशास्त्रज्ञ व कवींचा आश्रयदाता अशी प्रतिमा डोळ्यासमोर येते. बाणभट्टासारख्या संस्कृत विद्वानांनी व लेखकांनी त्याला आदररांजली वाहिल्याचे लक्षात येते. हाल राजाच्या गाथासप्तशतीतील महाराष्ट्री प्राकृत व इसवीसनाच्या ५ व्या शतकात दुसरा प्रवरसेन या वाकाटक राजाने लिहिलेल्या 'सेतुबंध' या काव्यग्रंथातील महाराष्ट्री प्राकृतात थोडाफार फरक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. 'सेतुबंध' मधील महाराष्ट्री प्राकृतावर संस्कृत भाषेचा थोडा जास्त प्रभाव पडल्याचे निदर्शनास येते असे अभ्यासक म्हणतात.

अभ्यासकांच्या मते हाल राजाने सिलोन (सद्याचा श्रीलंका) वर सैनिकि मोहीम काढली होती व या मोहीमेदरम्यान त्याला त्याचा सरसेनापती विजयनंद याने चांगली मदत केली होती. सिलोनच्या मोहीमेवरून परतताना हाल राजा सप्त गोदावरी भीमम् (हे ठिकाण आंध्र प्रदेशातील पूर्व गोदावरी जिल्ह्यात असावे असे काही अभ्यासकांचे मत आहे) येथे काही काळ थांबला होता. येथेच हाल राजाला सिलोनची राजकन्या लिलावती हिच्या अप्रतिम सौंदर्याविषयी माहिती मिळाली व त्याने सिलोनच्या या राजकन्येशी विवाह केला अशी अख्यायिका सांगितली जाते.

हाल राजानंतरचा प्रसिद्ध सातवाहन सम्राट म्हणजे गौतमीपुत्र सिरी (श्री) सातकर्णी हा होय. याने इसवीसन ७० ते इसवीसन ९५ या कालावधीत राज्य केले. गौतमीपुत्र श्री सातकर्णीने अनेक प्रदेश जिंकले व शक, यवन व पहलव या परदेशी टोळ्यांचा नायनाट केला अशी माहिती आपणास मिळते. गौतमीपुत्र सातकर्णीने नहपनाच्या शक क्षत्रप कुळाचा पूर्ण नाश केला असे दाखले आपणास आढळतात. नाशिक येथील लेण्यांतील शिलालेखावरुन आपणास अशी माहिती मिळते की, गौतमीपुत्राला यवन व पल्हव (पहलव) यांचा निःपात करणारा व सहरात वंशाचा समूळ उच्छेद करणारा कशी विशेषणे लावण्यात आली होती. तसेच शकांवर विजय प्राप्त केल्यावर त्याने त्यांच्या चांदीच्या नाण्यांवर स्वतःच्या नावाची व उज्जैनी चिन्हाची छाप उठवून आपल्या राज्यात वापरण्यास सुरुवात केली. गौतमीपुत्राच्या या नाण्यांचा साठा नाशिकमधील जोगळटेंभी येथे अभ्यासकांना सापडला आहे. गौतमीपुत्र सातकर्णीने अपरांत, अनुप सुराष्ट्र, कुकुर, अकर व अवंती हे प्रांत नहपानाकडून जिंकून घेतले होते. त्याचे ऋषीक (आंध्र प्रदेश), आस्माक (तेलंगणा), मुलक (औरंगाबाद - पैठण–महाराष्ट्र) व विदर्भ (महाराष्ट्र) या प्रदेशांवरदेखील वर्चस्व होते अशी माहिती मिळते. याचा अर्थ असा होतो की, सध्याच्या गुजरात, मध्यप्रदेश, तेलंगणा, आंध्र प्रदेश व महाराष्ट्र इत्यादी राज्यांमध्ये गौतमीपुत्राचे राज्य पसरलेले होते. अशाप्रकारे उत्तरेत माळवा व काठियावाड, पूर्वेकडे विदर्भ, पश्चिमेकडे कोकण तर दक्षिणेकडे कृष्णा नदीपर्यंत गौतमीपुत्र सातकर्णीचे साम्राज्य पसरलेले होते. गौतमीपुत्राला महाभारतात उल्लेखिलेल्या विंध्य, रिक्षावत, परीमात्र, महेंद्र तसेच सह्याद्री या पर्वतांचा स्वामी म्हटले जात असे. त्याचप्रमाणे गौतमीपुत्राने 'त्रिसमुद्रतोयपितवाहन' असा किताब देखील घेतलेला होता. या किताबाचा वा उपाधीचा अर्थ असा होतो की, गौतमीपुत्राची सत्ता पूर्वेकडे - बंगालचा उपसागर, पश्चिमेकडे - अरबी समुद्र व दक्षिणेकडे हिंद महासागरापर्यंत पसरलेली होती. गौतमीपुत्राच्या साम्राज्याची ही विशाल व्याप्ती पाहता तो अतिशय पराक्रमी व शूरवीर योद्धा होता याची प्रचीती येते.

इतिहासकारांच्या मते गौतमीपुत्र सातकर्णी हा

सातवाहन राजघराण्यातील सर्वात महान राजा होय. गौतमीपुत्र सातकर्णीचा उदय होईपर्यंत उत्तर व पश्चिम भारतात कुशाण, हुण, ग्रीक व अर्थात शकांसारख्या परकीय टोळ्यांनी आपले पाय रोवलेले होते. वायव्य भारतात तर कुशाणांचे साम्राज्य प्रस्थापित झाले होते. कालांतराने शक देखील भारतात घुसले व ते बराच काळ कुशाणांचे क्षत्रप म्हणून काठियावाड व पश्चिम राजपूताना या भागात सक्रिय होते. मात्र, नहपान या शक क्षत्रपाने आपल्या प्रदेशांचा विस्तार केला व मध्य भारत (माळवा व नर्मदेचे खोरे म्हणजचे सध्याच्या मध्य प्रदेश या राज्यातील बराचसा भाग) काबीज केल्यावर त्याने आपली वक्रदृष्टी महाराष्ट्रातील वऱ्हाड, कोकण तसेच कुंतल आदी प्रदेशांवर फिरवली. नहपान व त्याचा जावई ऋषभदत्त वा उषवदात हे सध्याच्या पुणे जिल्ह्यातील जुन्नर व कार्ले या भागांपर्यत पोहोचले, नव्हे या प्रदेशांवर त्यांनी आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. अशा बिकट समयी महाराष्ट्रावर राज्य करणारे सातवाहन सम्राट त्यामानाने कमकुवत ठरले असे म्हणणे वावगे ठरू नये. अशा या पार्श्वभूमीवर गौतमीपुत्र सातकर्णीचा उदय झाला व त्याने शकांचा बीमोड केला. गौतमीपुत्राविषयीची बरीचशी माहिती आपणास त्याच्या नाशिक येथील प्रशस्ती (शिलालेखावरुन) मिळते. गौतमीपुत्र सातकर्णीची माता गौतमीबलश्री हिने त्याची नाशिक येथील प्रशस्ती कोरवून घेतली होती.

इतिहासकारांचे असे म्हणणे आहे की, गौतमी पुत्राने नहपान या शक क्षत्रपाकडून जिंकून घेतलेले बरेचसे प्रदेश आपल्या मृत्युपूर्वी गमावले असावेत. गुजरात (काठियावाड) मधील जुनागढ या ठिकाणी इसवीसन १५० सालचा एक शिलालेख सापडलेला आहे. सदर शिलालेख तत्कालीन शक राजा रुद्रदमन (काही लेखक याचा उल्लेख रुद्रदामा वा रुद्रदामान असादेखील करतात) याने कोरविलेला आहे. या शिलालेखावरून आपणास असे जाणवते की, गौतमीपुत्र सातकर्णीने नहापनकडून जिंकलेले प्रदेश रुद्रदमनने पुन्हा एकदा काबीज केले होते. पश्चिम भारतातील शक क्षत्रपांनी सातवाहनांना एक मोठे आव्हान निर्माण केले होते यात वाद नाही. परंतु गौतमीपुत्र सातकर्णीने रुद्रदामाच्या घराण्यासोबत विवाह संबंध प्रस्थापित करून आपले हे काही प्रदेश वाचविण्याचा प्रयत्न केला होता असे अभ्यासक म्हणतात. या मताला पुरावा म्हणून कान्हेरी लेण्यांमधील (ह्या लेण्या मुंबईतील बोरिवलीनजीकच्या डोंगरांमध्ये प्राचीन काळी कोरण्यात आल्या होत्या. सध्या हा परिसर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीत येतो.) एका शिलालेखाचा दाखला दिला जातो. या शिलालेखात विशिष्ठीपुत्र सातकर्णी हा महाक्षत्रपाच्या (काही अभ्यासकांच्या मते हा महाक्षत्रप रुद्रदामाच असावा) मुलीचा पती होता असा उल्लेख आलेला आहे. अभ्यासक मानतात की, हा विशिष्ठीपुत्र सातकर्णी हा गौतमीपुत्र सातकर्णीचाच पुत्र असावा, गौतमीपुत्र सातकर्णी या महान सम्राटाच्या व्यक्तिमत्त्वाविषयी देखील आपणास माहिती मिळते. गौतमीपुत्र हा अतिशय देखणा, मोहक व तेजस्वी व्यक्तीमत्त्वाचा सम्राट होता असे संदर्भ आढळतात. त्याचप्रमाणे असे म्हटले जाते की, त्याची चालण्याची एक विशिष्ट ढब होती. त्याचे दंड व हात अतिशय पिळदार व लांब होते. या सम्राटाचे व्यक्तिमत्त्व एवढे प्रभावी होते की, त्याच्या सानिध्यात आल्यावर व्यक्तीचे भय पळून जात असे. याचा अर्थ असा की, सम्राट गौतमीपुत्र आसपास असल्यावर लोकांच्या मनात एक प्रकारची सकारात्मकता निर्माण होत असे व आत्मविश्वास निर्माण होत असे. त्यामुळेच या सम्राटाच्या एका इशाऱ्यावर अनेक सैनिक लढाया करावयास प्रवृत्त होत असत व त्याच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली प्राणपणाने लढून शत्रूवर तुटून पडत असत असे म्हणणे वावगे ठरू नये. जर सेनापती स्वतः शूरवीर व निधड्या छातीचा योद्धा असेल तर सैनिकांना देखील रणांगणावर

स्फूरण चढते. गौतमीपुत्र असाच महान योद्धा असल्यामुळे त्याने अनेक लढाया नव्हे, युद्धे जिंकून सातवाहनांच्या साम्राज्याचे शत्रूंपासून रक्षण तर केलेच, परंतु साम्राज्याचा विस्तार देखील केल्याचे आपल्या निदर्शनास येते. गौतमीपुत्राच्या ठायी असलेला अजून एक गुण म्हणजे त्याला त्याची माता गौतमीविषयी नितांत आदर होता व तो आपल्या मातेचा एक आज्ञाधारक पुत्र होता. तो सहसा शत्रूलादेखील अनाठायी इजा पोहोचवत नसे व तो सदाचारी व सद्गुणी लोकांचा आश्रयदाता होता. तसेच, वैभव व संपत्ती त्याच्या पायावर लोळत असे. गौतमीपुत्राचा आपली प्रजा सुखी व आनंदी राहील याकडे कटाक्ष असे. तो जे न्याय्य असतील असेच कर जनतेकडून वसूल करत असे. अभ्यासक म्हणतात की, गौतमीपुत्र सातकर्णी हा स्वतः एक अतिशय सद्गुणी व सदाचारी राजा होता.

गौतमीपुत्राविषयी अभ्यासक वेगवेगळी मते मांडताना आढळतात. गौतमीपुत्राने 'वार वरण विक्रम चारू विक्रम' अशी उपाधी वा किताब घेतला होता. त्यामुळे काही तज्ज्ञांच्या मते प्राचीन लोककथांमध्ये प्रसिद्ध असलेला 'विक्रमादित्य' हा राजा व गौतमीपुत्र सातकर्णी हा सम्राट म्हणजे एकच होत. परंतु काही अभ्यासक म्हणतात की, 'सिंहासन बत्तीशी' मधील विक्रमादित्य व गौतमीपुत्र सातकर्णी हे दोन वेगवेगळे असावेत. गौतमीपुत्र सातकर्णीने घेतलेल्या किताबातील विक्रम या शब्दाचा अर्थ म्हणजे तोच विक्रमादित्य होय असे म्हणणे योग्य ठरणार नाही असे काही इतिहासकार म्हणतात. याउलट गौतमीपुत्राच्या किताबाचा 'वार वरण विक्रम चारू विक्रम' याचा अर्थ एका रुबाबदार व सुंदर हत्तीसारखी चाल असणारा असा होतो व 'विक्रमादित्य' या किताबाचा अर्थ सूर्याप्रमाणे शौर्य असणारा असा होतो. विक्रमादित्य हा शब्द विक्रम म्हणजेच शौर्य व आदित्य म्हणजेच सूर्य या दोन शब्दांपासून बनलेला आहे. असो. असेही म्हटले जाते की, गौतमीपुत्र सातकर्णी व त्याचा पुत्र विशिष्ठीपुत्र पुलुमायी हे दोघं एकत्र राज्य करत होते. परंतु काही अभ्यासकांना हे मत मान्य नाही.

गौतमीपुत्र श्री सातकर्णीनंतर वशिष्ठीपूत्र सामी श्री (स्वामीश्री) पुलुमायी हा सातवाहन सम्राट बनला. वशिष्ठीपुत्र सामी श्री पुलमायी हा सातवाहन राजा दुसरा पुलुमायी म्हणून देखील प्रसिद्ध आहे व याने इसवी सन ९६ ते इसवी सन ११९ या कालावधीत म्हणजेच जवळ जवळ चोवीस वर्षे राज्य केले. दुसऱ्या पुलुमायीच्या काळात सातवाहनांची सत्ता व कीर्ती अत्युच्च शिखरावर व यशाच्या परमोच्च बिंदूवर होती असे अभ्यासक म्हणतात. पुलुमायीने आपला महान पिता गौतमीपुत्र सातकर्णी याने निर्माण केलेले साम्राज्य तर खंबीरपणे सांभाळलेच परंतु त्याने त्या साम्राज्याचा विस्तारदेखील केला. त्याने सातवाहन साम्राज्याचा प्रामुख्याने दक्षिणेकडे विस्तार केला असे अभ्यासक म्हणतात. त्याने नवनगर नामक नगरीचे देखील निर्माण केले असे म्हटले जाते. तसेच पुलुमायीने 'नवनगरस्वामी', 'महाराज' व 'दक्षिणपथेश्वर' असे किताब घेतलेले आढळतात. पुलुमायीची अनेक नाणी वेगवेगळ्या ठिकाणांहून सापडलेली आहेत. या काळात सातवाहन साम्राज्यात आर्थिक सुबत्ता व समृद्धी होती असे अभ्यासकांचे मत आहे. याच्याच काळात अमरावती येथील बौद्ध स्तूपाचे सौंदर्यीकरण करण्यात आले होते. पुलुमायीची संपूर्ण जगभर कीर्ती पसरलेली होती. याचा पुरावा म्हणजे प्राचीनकालीन ग्रीक खगोलतज्ज्ञ टोलेमी याने देखील पुलुमायीचा उल्लेख पश्चिमेतील शक क्षत्रप 'चेस्टन' (चास्टन काही ठिकाणी 'चाष्टन' असादेखील उल्लेख आला आहे.) याचा समकालीन असा उल्लेख केलेला आढळतो. पुलुमायीच्या शेवटच्या कालखंडात शक क्षत्रप चेस्टन याची ताकद वाढत गेल्याचे निदर्शनास येते. त्याने हळूहळू कच्छ कुकुर, सुरत, अवंती, अकार असे प्रदेश ताब्यात घेतलेले आढळतात. तसेच त्याने

'महाक्षत्रप' हा किताब घेतलेला निदर्शनास येते.

दुसऱ्या पुलुमायी वा वशिष्ठीपुत्र सामी (स्वामी) श्री पुलुमायी नंतर वशिष्ठीपुत्र श्री सातकर्णी हा सातवाहन सम्राट बनला. वायु पुराणात या सातवाहन नृपतीचा उल्लेख येतो व या पुराणानुसार त्याने एकंदरीत एकोणतीस वर्षे राज्य केले अशी माहिती मिळते. तज्ज्ञांचे असे मत आहे की, त्याने इसवी सन १२० ते इसवी सन १४९ या कालावधीत राज्य केले असावे. वशिष्ठीपुत्र श्री सातकर्णी हा शक क्षत्रप रुद्रदमन (रुद्रदामा) याचा जावई होता अशी माहिती आपणास काही स्रोतांतून मिळते. या सातवाहन राजाची नाणी मोठ्या प्रमाणात सापडलेली आहेत. तसेच वशिष्ठीपुत्र श्री सातकर्णी या सातवाहन राजाविषयीची माहिती आपणास कान्हेरी (मुंबई) येथील लेण्यांमधील शिलालेखावरून देखील मिळते.

वशिष्ठीपुत्र श्री सातकर्णीनंतरचा प्रसिद्ध सातवाहन राजा म्हणजे शिव श्री पुलुमायी हा होय. याने साधारणतः इसवी सन १५० ते इसवी सन १५६ या कालावधीत राज्य केले. काही अभ्यासकांच्या मते शिवश्री पुलुमायी हा दुसऱ्या पुलुमायीचा म्हणजेच विशिष्ठपुत्र स्वामी श्री पुलुमायी याचा नातू होता व हाच तो सातवाहन वा सातकर्णी होय ज्याचा शक क्षत्रप रुद्रदामाने पराभव केला होता. अशा तऱ्हेने सातवाहनांच्या काही राजांच्या कारकीर्दीतील महात्त्वाच्या घटनांच्या बाबतीत इतिहासकारांमध्ये मतभिन्नता असल्याचे आपल्या निदर्शनास येते. शिव श्री पुलुमायीनंतर त्याचा पुत्र श्री शिवखद सातकर्णी हा राजा बनला व त्याने इसवी सन १५७ ते इसवी सन १५९ या कालावधीत राज्य केले.

इसवीसन १६० साली गादीवर आलेला श्री यज्ञ वा यज्ञश्री सातकर्णी हा या नंतरचा महत्त्वाचा सातवाहन सम्राट ठरतो. याने इसवीसन १८९ पर्यंत राज्य केले असे अभ्यासकांचे मत आहे. कान्हेरी (मुंबई), नाशिक तसेच गुंटूर (आंध्र प्रदेश) या ठिकाणांहून यज्ञश्रीचे शिलालेख वा कोरीव लेख सापडले आहेत. यावरून याचे राज्य पश्चिम समुद्र (अरबी समुद्र) ते पूर्व समुद्रापर्यंत (बंगालचा उपसागर) पसरलेले होते हे सिद्ध होते. काही अभ्यासकांच्या मते या काळात काही पुराणांमध्ये नवीन बदल करण्यात आले. बाणाने उल्लेख केलेला 'त्रिसमुद्राधिपती' हा सातवाहन नृपती म्हणजे यज्ञश्रीच होय असा एक मतप्रवाह आहे. यज्ञश्री सातकर्णीची देखील नाणी मोठ्या प्रमाणात सापडली असून ती गुजरात, काठियावाड, सोपारा, चंद्रपूर (पूर्वीचा चांदा जिल्हा), अकोला, गोदावरी (आंध्र प्रदेश) तसेच कृष्णा (आंध्र प्रदेश) आदी ठिकाणांहून सापडली आहेत. यावरूनच त्याच्या विशाल साम्राज्याची व्याप्ती लक्षात येते. यज्ञश्री सातकर्णी हा सातवाहनांचा शेवटचा बलशाली सम्राट होता असे अभ्यासकांचे मत आहे, कारण याच्या कारकीर्दीच्या शेवटच्या काळातच सातवाहनांच्या साम्राज्याची पडझड होण्यास सुरुवात झाली. अभिर (आभिर) कुळातील योद्ध्यांनी याच काळात नाशिकच्या आसपासचा प्रदेश सातवाहनांकडून आपल्या ताब्यात घेतला असे म्हटले जाते.

यज्ञश्री नंतर मधारी स्वामी सकेषण हा राजा बनला. या राजाचीदेखील नाणी उपलब्ध आहेत. या राजाच्या नाण्यांवर सिंह तसेच हत्तीची प्रतिमा आढळते. यानंतर विजय नामक राजा घेऊन गेला व त्याने सहा वर्षे राज्य केले असावे असे अभ्यासक म्हणतात. विजय नंतर वशिष्ठपुत्र श्री चंडी सातकर्णी हा राजा बनला. यानंतरच्या काळात सातवाहन साम्राज्याचे विघटन झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे व चौथा पुलुमायी हा सातवाहनांच्या मुख्य शाखेचा तत्कालीन राजा होता असे म्हटले जाते. या राजवंशाच्या शेवटच्या काळात सातवाहन साम्राज्याचे विघटन होऊन पल्लव, इक्ष्वाकू, अभीर अशा राजघराण्यांचे सातवाहनांच्या साम्राज्यातील विविध भागांवर राज्य निर्माण झाले. वाकाटकांचा देखील याच काळात उदय झाला असे इतिहासकारांचे मत आहे.

सातवाहन राजांनी त्याकाळात कार्यक्षम राज्यव्यवस्था प्रस्थापित केली होती असे आपल्या निदर्शनास येते. सातवाहन राजे हिंदूधर्मीय असल्याने ते 'हिंदूधर्मशास्त्रां'प्रमाणे आपले राज्यशासन हाकत असत. राजानंतर त्याचा पुत्र गादीवर येत असे व राजपुत्र जर अल्पवयीन असेल तर त्याच्या नावाने त्याचा चुलता (मृत राजाचा भाऊ) वा माता राज्यकारभार हाकत असत अशी माहिती आपणास मिळते. वेदीश्री व सतीश्री सातकर्णी या अल्पवयीन राजपुत्रांच्यावतीने त्यांची माता व पहिल्या सातकर्णीची विधवा राणी नयनिका राणीने काही काळ राज्यकारभार चालविला होता अशी माहिती आपणास मिळते. सातवाहन राजे धर्मशास्त्रांप्रमाणे राज्य करत असल्यामुळे ते राजाच्या दैवी अधिकारांच्या सिद्धांतामध्ये विश्वास ठेवत नसत. बहुधा स्वतःला फक्त 'राजा' असाच किताब घेत असत. राजा हा युद्धादरम्यान स्वतः सैन्याचे नेतृत्व करत असे. त्यामुळे राजा हा सैन्याचा सरसेनापती असे. सातवाहन सम्राट रणांगणांवर स्वतः आपल्या सैन्यासोबत शत्रुविरुद्ध लढत असत. यावरून त्यांचे शौर्य व धैर्य निदर्शनास येते. राजपुत्रांना 'कुमार' असे संबोधले जात असे. राजपुत्रांना विविध प्रांतांचे प्रांताधिकारी वा सुभेदार म्हणून नियुक्त केले जात असे. सातवाहनांचे साम्राज्य जनपदांमध्ये विभागले जात असे व जनपदांचे विभाजन आहारांमध्ये होत असे. 'आहार' म्हणजे सध्याचा 'जिल्हा' असे म्हणता येईल. पल्लवांच्या काळात आहारांना 'राष्ट्र' असे संबोधले जाई. आहारांचे विभाजन अनेक ग्रामांमध्ये होत असे. आहारांचे प्रशासन पाहणाऱ्या अधिकाऱ्यास 'अमात्य' असे म्हटले जात असे. अमात्य हे पद वंशपरंपरागत नसून या अधिकाऱ्यांची वेगवेगळ्या आहारांचा अमात्य म्हणून नियुक्ती व बदली केली जात असे. गोवर्धन, मामल, कापूर अशा काही आहारांची नावे आपणास सातवाहनांच्या शिलालेखांवरून मिळाली आहेत. ग्रामीण हा अधिकारी ग्रामाचा मुख्य प्रशासक असे. सातवाहनकालीन इतर काही प्रशासकीय अधिकाऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत – महात्रक, महाआर्यक, भांडागारिक, हेरानिक, महामात्र, निबंधकार, प्रतिहार व दुतक. या सर्व अधिकाऱ्यांकडे प्रशासनातील व एकंदरीतच राज्यकारभारातील विविध जबाबदाऱ्या दिल्या जात असत. राज्याला, राजवंशाच्या मालकीची असलेली जमीन तसेच मालमत्ता, इतर शेत जमीनीपासून गोळा केलेला शेतसारा (भूमी कर), मीठावरील कर इत्यादी स्रोतांतून महसूल प्राप्ती होत असे. सातवाहन काळात राजांचा प्रकर्षाने कटाक्ष असे की, जनतेवर कमीतकमी करांचा बोजा लादला जावा. हे लोककल्याणकारी राज्याचे द्योतक होते यात वाद नाही. सातवाहन काळात तांब्याची, चांदीची व सोन्याची नाणी चलनात असल्याचे निदर्शनास येते. तांब्याच्या व चांदीच्या नाण्यांना 'कर्षपान' असे म्हटले जात असे. सोन्याच्या नाण्याला 'सुवर्ण' असे म्हटले जात असे.

सातवाहनकालीन समाजव्यवस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे लोक ज्या क्षेत्रात कार्यरत असत त्यावरून त्यांची तत्सम् वर्गात वर्गवारी होत असे. अशातऱ्हेने सातवाहनकालीन समाजाचे विभाजन चार वर्गांमध्ये झालेले होते असे आढळते. समाजातील अतिउच्च वर्गामध्ये 'महाराठी', 'महाभोज' व 'महासेनापती' यांचा समावेश असे. हे लोक राजाला त्याच्या प्रशासनात मदद करणारे उच्चपदस्थ अधिकारी असत. अनेकदा हे लोक जिल्हा म्हणजेच 'आहार' पातळीवरील प्रशासनाचे प्रमुख असत व यांचे सातवाहन राजवंशाशी कौटुंबिक नातेसंबंधदेखील असत असे काही अभ्यासकांचे मत आहे. यानंतर म्हणजेच समाजातील दुसरा महत्त्वाचा वर्ग म्हणजे अमात्य, महामात्र व भांडागारिक अशा अधिकाऱ्यांचा व नैगम (व्यापारी) सार्थवाह (व्यापाऱ्यांच्या गटाचा प्रमुख) श्रेष्ठी (व्यापारी वा व्यापाऱ्यांच्या संस्थेचा वा संघाचा प्रमुख) अशा व्यक्तींचा वा गटाचा असे. समाजातील तिसऱ्या वर्गात

लेखक, वैद्य, हालकिय (शेती करणारा), सुवर्णकार (सोनार) व गांधीक (औषध विक्रेता-Druggist) यांचा समावेश असे. समाजाच्या चौथ्या वर्गात वार्धकी (सुतार), माल(ळ)कार-(माळी-Gardener), लोहवाणिज (लोहार) व दासक (कोळी) यांचा समावेश असे.

शेतकरी व व्यापारी या प्रवर्गात येणाऱ्या लोकांचे अनेक गृह, कुटुंब वा कुळांमध्ये विभाजन होत असे. अशा प्रत्येक गृहाच्या, कुटुंबाच्या वा कुळाच्या प्रमुखाला 'गृहपती' वा 'कुटुंबी' असे संबोधले जात असे. गृहपतीला त्याच्या कुटुंबात फार मानाचे स्थान असे व कुटुंबातील वा कुळातील सदस्य त्याच्या आज्ञेप्रमाणे वागत असत. सातवाहनकालीन सामाजिक व्यवस्थेचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे त्याकाळात वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या लोकांच्या व व्यापाऱ्यांच्या 'श्रेणी' असत. आपणास त्याकाळातील तेल गाळणाऱ्या तेल्यांच्या, कुंभारांच्या, विणकरांच्या, मक्याच्या व्यापाऱ्यांच्या, बांबूतोड कामगारांच्या श्रेणींविषयी माहिती मिळते. 'श्रेणी' फक्त व्यापाऱ्यांच्या संस्था वा संघ नसत तर त्या आधुनिक काळातील बँकांप्रमाणे काम करत असत. अशा श्रेणींमध्ये लोक आपली गुंतवणूक ठेवत असत व त्यावर त्यांना व्याज देखील मिळत असे. समाजातील प्रतिष्ठित लोक श्रेणींना देणगीदेखील देत असत अशी माहिती आपणास मिळते. काही स्रोतांतून अशी माहिती मिळते की, गुंतवणूकदारांना त्यांच्या गुंतवणूकीवर वर्षाला नऊ टक्के तसेच बारा टक्के एवढे व्याज मिळत असे.

सातवाहनांच्या काळात समुद्रीमार्गाने मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय व्यापार चालत असे अशी माहिती आपणास मिळते. पश्चिमेकडून तांबडा समुद्र मार्गे व्यापारी जहाज अरबी समुद्रात येऊन सिंधू नदीच्या मुखाकडे (जेथे ती समुद्राला मिळते म्हणजे आजचा पाकिस्तानमधील सिंध प्रांत), भडोच (गुजरात), तसेच मलबार (केरळ) कडे जात असत अशी माहिती मिळते. सातवाहन काळात पैठण, तगर, सोपारा व कल्याण ही ठिकाणे म्हणजे मोठ्या बाजारपेठा होत्या. सोपारा व कल्याण ही त्याकाळातील आंतरराष्ट्रीय दर्जाची बंदरे होती. यावरून सातवाहन सम्राटांनी बंदरांच्या विकासाला व जलमार्गीय व्यापाराला चालना दिल्याचे निदर्शनास येते. अभ्यासकांच्या मते दुसरा पुलुमायी व यज्ञश्री सातकर्णी यांच्या काळापासून तर भारताचा पूर्वेकडील देशांसोबत (आग्नेय व अतिपूर्वेकडील आशिया) व्यापार तर वाढलाच; परंतु सोबतच भारतीय लोक तेथे स्थायिक होऊन त्यांनी तेथे भारतीय संस्कृती व परंपरांचा प्रसार करण्यास सुरुवात केली असे काही अभ्यासक म्हणतात.

सातवाहन सम्राट स्वतः जरी हिंदू असले तरी त्यांनी बौद्ध धर्माला आश्रय दिल्याचे आढळते. सातवाहन काळात बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाल्याचे निदर्शनास येते. सातवाहनकाळात नाशिक, भजे, कोंडाणे (महाराष्ट्र) तसेच अमरावती, घंटाशल, गुम्मादिदुरु (आंध्र प्रदेश) अशा व इतर अनेक ठिकाणी बौद्धलेणी होत्या व तेथून बौद्ध धर्माशी निगडित शिलालेख देखील सापडलेले आहेत. यावरून सातवाहन सम्राटांनी बौद्ध भिक्कूंना व एकंदरीतच बौद्ध धर्माला आश्रय दिल्याचे निदर्शनास येते. राजांप्रमाणेच उच्चपदस्थ अधिकारी व व्यापारी देखील बौद्ध विहारांना व बौद्ध संघांना देणग्या व इतर मदत देत असत. दख्खनमधील बौद्ध लेणी सातवाहन काळातच कोरल्या गेल्याचे इतिहासकारांचे मत आहे. या काळात कोरल्या गेलेल्या बौद्ध लेणी दोन प्रकारात मोडतात. हे दोन प्रकार म्हणजे 'चैत्यगृह' - प्रार्थनास्थळ व 'लयन' - बौद्ध भिक्कूंचे निवासस्थान हे होत. चैत्यगृहाच्या मधोमध स्तूप असे, तर लयनगृहात मधोमध खुली वा मोकळी जागा सोडलेली असून त्या मोकळ्या जागेच्या बाजूने भिक्कूंसाठीचे कक्ष वा खोल्या असत व प्रत्येक कक्षात त्यांना झोपण्यासाठी सपाट

उंच उडी मारण्यासाठी चार पावले मागे जावेच लागते.

शिळेचे (दगडाचे) आसन असे. बौद्ध भिक्कूंच्या या लेणी बांधण्यात वा कोरण्यात राजा, अधिकारी, व्यापारी, तसेच समाजातील सामान्य लोकांचादेखील समावेश असे. या लेण्यांच्या डागडूजीसाठी व तेथे राहणाऱ्या भिक्कूंच्या गरजा पुरविण्यासाठी आर्थिक प्रयोजन केले जात असे. या लेण्यांची डागडुजी करण्यासाठी सामान्य जनतादेखील सढळ हस्ते मदत वा देणग्या देत असे. भिक्कूंच्या आहाराच्या वा खाण्यापिण्याच्या प्रयोजनासाठी त्यांना शेतजमिनी दिल्या जात वा पैश्याच्या स्वरूपात देणग्या दिल्या जात. अनेकदा अशी देणगी स्वरूपातील रक्कम व्यापाऱ्यांच्या संघरूपीय बँकांमध्ये ठेवली जात असे. बौद्ध भिक्कू लेण्यांचा वापर फक्त पावसाळ्यात आपल्या निवासासाठी करत असत व एरवी ते वेगवेगळ्या ठिकाणी म्हणजेच प्रदेशांत व गावांना भेटी देत असत. काही लेणी काही विशिष्ट बौद्ध भिक्कूंच्या संघांच्या वापरासाठी असत. उदाहरणार्थ, नाशिक येथील लेणी (पांडवलेणी), भद्रायन भिक्कू संघ वापरत असे तर कार्ले येथील लेणी महासंघीक संघाचे भिक्कू वापरत असत. याकाळात भद्रायन (नाशिक व कान्हेरी), महासंघीक (कार्ले व आसपासचा परीसर), धम्मत्तरीय (सोपारा), चेरीकिय, पुब्बसेलीय, अवरसेलीय, उतयपाभी व महाविनयशिल (पूर्व दख्खन म्हणजेच आंध्र प्रदेश) हे वेगवेगळे बौद्धसंघ भरभराटीस आलेले निदर्शनास येते. या विविध बौद्धसंघामध्ये द्वेषभाव व स्पर्धा नसून ते नेहमीच एकमेकांना मदत करण्यास तयार असत. महास्थाविर, स्थाविर, चरक व तेविजस हे महाराष्ट्रातील त्याकाळातील काही प्रसिद्ध बौद्ध तत्त्ववेत्ते व प्रचारक होत. पूर्व दख्खनमध्ये देखील असेच अनेक बौद्ध धर्मप्रसारक कार्यरत होते व सामान्य लोक त्यांचा उपदेश श्रवण करत असत.

सातवाहन काळात यवन, शक, पहलव तसेच अभीर (आभीर) अशा परकीय टोळ्यांनी बौद्धधर्माचा तसेच हिंदू धर्माचा स्वीकार केला असल्याचे निदर्शनास येते. यातील अतिशय महत्त्वाचे उदाहरण म्हणून शक क्षत्रप रुद्रदमन (रुद्रदामा) याचे उदाहरण देता येईल. याने हिंदू धर्माचा स्वीकार केला होता. सिहाध्योय, धर्म, इसिला, इंद्राग्निदत्त आदी यवनांनी बौद्ध भिक्कूंना मदत केल्याचे व त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्याचे दाखले आपणास मिळतात.

सातवाहन काळात अनेक कलांची भरभराट झाली यात वाद नाही. याचा पुरावा म्हणजे त्याकाळात साम्राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी निर्माण केलेले वा निर्माण झालेले बौद्ध स्तूप, लेणी, चित्रकला व शिल्पकला होय. आपणास आंध्र प्रदेशातील जग्गयपट, भट्टीप्रोलू, चांटसल, अमरावती, नागार्जुनकोंडा आदी ठिकाणी अनेक स्तूपांचे व शिल्पांचे वा मूर्त्यांचे अवशेष सापडलेले आहेत. यातील अमरावती येथील स्तूप हे सर्वात मोठे असल्याचे निदर्शनास येते. अमरावती येथील बौद्ध स्तूपांची व त्यांच्या शैलीची अनेक अभ्यासकांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. स्तूपांप्रमाणेच सातवाहन काळात शिल्पकला वा मूर्तीकलेची मोठ्या प्रमाणात प्रगती झाली होती. प्रामुख्याने स्त्रियांची शिल्पे बघण्यासारखी आहेत. अभ्यासकांनी ही शिल्पे स्त्रियांचे सौंदर्य, मादकता तसेच त्यांची शारीरिक वैशिष्ट्ये व ठेवण तसेच त्यांचा पोशाख अचूक टिपतात वा त्याचे अचूक दर्शन घडवितात व बघणाऱ्याचे लक्ष वेधून घेतात असे म्हटले आहे.

गौतम बुद्धाची देखील याकाळात अप्रतिम शिल्पे घडविल्याचे आपल्या लक्षात येते. प्रामुख्याने अमरावती (आंध्र प्रदेश) येथील महात्मा गौतम बुद्धाची विशाल शिल्पे नजरेत भरतात. या मूर्त्या भगवान बुद्धाला 'समाजाला शिकवण देणारा तत्त्ववेत्ता' अशा स्वरूपात दाखवतात. अजंठ्यातील चित्रकलेची सुरुवात खऱ्या अर्थाने सातवाहन काळात झाली असल्याचे

अभ्यासकांचे मत आहे. येथील लेणी क्रमांक दहा मधील गौतम बुद्धाचे चित्र फारच आकर्षक असून ते इसवी सनापूर्वीच्या दुसऱ्या शतकात बनवले गेले असावे असे अभ्यासकांचे मत आहे. या चित्रात गौतमबुद्धाला लाल वस्त्रांमध्ये बसलेल्या अवस्थेत दाखविलेले असून त्याच्या कपाळावर चंदनाचा टिळा असल्याचे व त्याच्या आजूबाजूला बौद्ध भिक्कू व घरादारातील सामान्य मंडळी उभी असल्याचे दाखविण्यात आले आहे.

सातवाहन सम्राट स्वतः हिंदू धर्मीय असले तरी त्यांनी बौद्धधर्माला आश्रय दिल्याचे आपण पाहिलेच आहे. त्यामुळे हिंदू धर्माप्रमाणेच बौद्धधर्माची देखील त्याकाळात भरभराट झाल्याचे आपल्या निदर्शनास येते. सातवाहन राजे हे स्वतः ब्राह्मण होते व ते अनेक यज्ञ व याग करत असत. नाणेघाटातील नयनिका या सातवाहन सम्राश्रीच्या शिलालेखावरून आपणास त्याकाळातील विविध धार्मिक विधी व यज्ञांविषयी माहिती मिळते. आपणास अशी माहिती मिळते की, पहिल्या सातकर्णीने दोन अश्वमेध यज्ञ व एक राजसूय यज्ञ केला होता. पहिल्या सातकर्णीनेच अग्न्यध्येय, अन्वरंभनिय, गवमयन, अगीरसतीरत्र, अप्तोर्मय, अंगीरसमयन, गर्गतिरत्र, चंडोगपवनमतिरत्र, त्रयोदसरत्र, दसरत्र आदी यज्ञ व याग केल्याचे अभ्यासकांचे मत आहे. यज्ञांसोबतच ब्राह्मणांना मोठ्या प्रमाणात दान व देणग्या दिल्या जात असत. आपणास ४२,७०० गायी, १० हत्ती, १०० अश्व (घोडे), १७ चांदीची भांडी, एक घोड्याचा रथ व ६८,००० कर्शपान एवढ्या गोष्टी दक्षिणा म्हणून दिल्याची माहिती मिळते. काहीवेळा गावेदेखील दान वा दक्षिणा म्हणून दिली जात असत. सातवाहन राजे संकर्षन, वासूदेव, इंद्र, सूर्य, चंद्र आदी देवांची उपासना करत असत. हाल राजाच्या गाथासप्तशतीमध्ये इंद्र, कृष्ण, पशुपती व गौरी इत्यादी हिंदू देव-देवतांचा उल्लेख येतो. त्याकाळात भगवान शिव, भगवान विष्णू व स्कंद वा कुमार (भगवान शिव व माता पार्वतीचा पुत्र) यांची पूजा केली जात असे. भगवान शिवाची पूजा शिव, महादेव, भव व भूतपाल या चार नावांनी केली जात असे. तसेच त्याचे वाहन नंदी, रिशवनाक व रिशवदत अशा नावाने ओळखले जाई. तसेच स्कंद हा देव स्कंदपलीत, शिवस्कंदील व शिव स्कंदगुप्त या नावाने प्रसिद्ध होता. तसेच सातवाहन काळात सर्प पूजा देखील केली जात असे ही बाब आपल्या निदर्शनास येते. कारण आपणास अनेकदा सर्प, सर्पिल व नाग असे शब्द आलेले लक्षात येते.

प्राचीन काळात महाराष्ट्र व दक्षिण भारतात सातवाहनांनी विशाल साम्राज्य प्रस्थापित केले व महाराष्ट्री प्राकृत भाषेच्या विकासाला चालना दिली. तसेच त्यांचे मूळ महाराष्ट्रात असल्यामुळे आपणा सर्वांना त्यांचा रास्त अभिमान असायला हवा.

**संदर्भ :**


• एनशियंट इंडिया : व्ही. डी. महाजन

• भारतीय विद्या भवन्स हिस्ट्री अँड : द क्लासिकल कल्चर ऑफ द इंडियन पिपल एज् व्हॉल्यूम-३

• गाथासप्तशती : स. आ. जोगळेकर

• विश्वकोश

• भारतीय संस्कृती कोश

• ॲन ॲडव्हान्स्ड हिस्ट्री ऑफ इंडिया : आर. सी. मजूमदार, एच्. सी. रे चौधरी, कालिकिंकर दत्ता



**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com


•••

# दर्शन सूर्याच्या कंकणाचे

*डिसेंबर महिन्याच्या २६ तारखेला सूर्यग्रहण होते आणि तेही कंकणाकृती. लेखकाने या दूर्मीळ दृश्याची माहिती या लेखात करून दिली आहे – संपादक*

मागील वर्षी डिसेंबर महिन्यात खगोलीय घटनांचा मागोवा घेणाऱ्या लोकांच्या गोटात फारच उत्साह होता. त्याला कारणही तसेच होते. निसर्गाने त्यांच्यासाठी एका दूर्मीळ अशा घटनेची व्यवस्था करून ठेवली होती. डिसेंबर महिन्याच्या २६ तारखेला सूर्यग्रहण होते आणि तेही कंकणाकृती. हे दूर्मीळ दृश्य भारताच्या दक्षिणेकडील राज्यातून दिसणार होते. त्यासाठी देशाच्या मध्य, उत्तर आणि पूर्व भागात राहणाऱ्या लोकांनी दक्षिण भारतात गर्दी केली होती. खगोल मंडळाच्या अनेक सभासदांनी दक्षिण भारतात जाण्याची योजना आधीच आखून ठेवली होती. दक्षिणेकडे जाणाऱ्या गाड्यांची तिकिटे तर लोकांनी घेतलीच; त्याचबरोबर जेथे जायचे तेथील हॉटेलचे आरक्षण देखील त्या लोकांनी करून ठेवले होते. त्यामुळे तमिलनाडू आणि केरळ या राज्यातील अनेक हॉटेलांना चांगला व्यवसाय मिळाला. या निमित्ताने भारताच्या वेगवेगळ्या राज्यांमधील लोक भारताच्या दक्षिण भागात एकत्र आले होते.



**ग्रहण बघायला आलेल्या लोकांची गर्दी**

सगळ्या बाबींचा सारासार विचार करून आम्ही कोइमतूरला जायचे ठरविले. ठरल्याप्रमाणे एक दिवस आधीच आम्ही तिथे पोहोचलो. सूर्यग्रहण सकाळी लागणार होते. म्हणून आम्ही सूर्य उगवायचा आधीच उठून तयारी करू लागलो. हे करीत असताना मधून मधून बाहेर डोकावून आम्ही हवामानाचा अंदाज घेत होतो. सूर्य उगवतात आमच्या लक्षात आले की आकाशात ढग आले आहेत. ग्रहण लागण्यास थोडासाच अवधी होता. एवढ्या कमी वेळात ढग जातील याची सुतराम शक्यता नव्हती. आम्ही ज्या कामासाठी आलो त्यातच व्यत्यय येत होता. आम्हाला आमची जागा बदलणे आवश्यक होते. कोइमतूर पासून थोडे अंतर दूर जाण्यात अर्थ नव्हता. एखाद्या उंच ठिकाणी जाणे आवश्यक होते. स्थानिक लोकांशी चर्चा करून आम्ही उटीला जायचे ठरविले. त्याच्याच मदतीने एक टॅक्सीवाल्याला गाठला. मोडक्या तोडक्या इंग्रजीचा वापर करून आम्ही आमची गरज त्याला समजावू शकलो. त्याने आम्हाला तेथे न्यायचे कबूल केले. कोईमतूर ते उटी यामधील रस्ता चांगला असल्याने आम्हाला प्रवासाला फारसा वेळ लागला नाही. वेळेच्या आधी इच्छित स्थळी आम्ही पोहोचलो. रस्त्याच्या बाजूलाच डोंगराच्या एका कड्यावर योग्य जागा शोधून आम्ही कामाला लागलो. आम्ही डोंगरावर पोहोचल्याने ढगाची काळजी मिटली. उलट ढग खाली आणि आम्ही वर अशी तिथे स्थिती होती.



डोंगरकड्यावरील आमचे स्थान


इच्छित स्थळी पोहोचल्यावर आम्ही आमचे कॅमेरे सज्ज करून ग्रहण लागण्याची वाट पाहू लागलो. आम्हाला जास्त वेळ वाट पाहावी लागली नाही. ग्रहणाला सुरुवात झाली. सूर्याचा वरचा भाग क्रमाक्रमाने झाकला जाऊ लागला. आम्ही काळ्या फिल्मचे चश्मे घेऊनच गेलो होतो. त्यातून आम्ही सूर्याकडे पाहात आहोत हे तेथल्या लोकांच्या लक्षात आले. त्यांनी सूर्य पाहण्याची इच्छा व्यक्त केली. अशावेळेस उपयोगी पडतील म्हणून आम्ही जास्तीचे गॉगल्स नेले होते. ते त्यांना दिले. शेजारी राहणाऱ्या एका माणसाने ग्रहण पाहिल्यावर बाईने ग्रहण पाहिले तर चालेल काय? अशी विचारणा केली. आम्ही होकारार्थी मान हलविताच तो घरात जाऊन आपल्या पत्नीला घेऊन आला. नंतर दोघांनीही ग्रहणाचा मनसोक्त आनंद लुटला. आमच्या भोवतीतर लहान मुलांचा गराडाच पडला होता. त्यानादेखील ग्रहण बघण्याची दूर्मीळ संधी मिळाली.





उत्साहाने ग्रहण बघणारी स्थानिक मुले

ठरलेल्या वेळेला सूर्याचा भाग झाकला जाऊ लागला. याच वेळेची तर आम्ही आतुरतेने वाट पाहात होतो. जसजसा सूर्य झाकत गेला तसतसा आमचा उत्साह वाढत गेला. आमच्याकडे असलेल्या कॅमेऱ्याने आम्ही अनेक छायाचित्रे काढली. त्यातील दोन चित्रे खाली दिलेली आहेत. यावरून सूर्य क्रमाक्रमाने कसा झाकत गेला याची चांगली कल्पना येते.





झाकलेल्या सूर्याचे फोटो

म्हणता म्हणता महत्त्वाची वेळ आली. सूर्याची कडा लहान लहान होत जाऊन कंकण दिसायला लागले. ही घटना चित्रबद्ध करण्यासाठी आमचे कॅमेरे सरसावले. ही दूर्मीळ घटना आम्ही चांगल्या पद्धतीने चित्रबद्ध करू शकलो. खाली सूर्याच्या कंकणाचे काही फोटो दिले आहेत.





कंकणाचे फोटो

कंकणाचे दर्शन झाल्यानंतर ग्रहण हळूहळू सुटू लागले. ज्या दिशेने सूर्य झाकत गेला त्याच्या विरुद्ध दिशेने ग्रहण सुटत गेले. काही मिनिटांचा हा खेळ पण

(पृष्ठ क्र. २९ वर)

# समांतर चित्रपटाची ५० वर्षे

*समांतर सिनेमाच्या ५० वर्षांवर प्रकाश टाकणारा श्री. निरंजन कुलकर्णी यांचा लेख – संपादक*

चित्रपट ही कला समाजाच्या सर्व स्तरावर वेगाने जाऊ शकते. सर्व समाजावर तिचा भक्कम प्रभाव पडू शकतो. अशी चित्रपटांची ही ताकद प्रारंभीच्या व्यावसायिकांच्या लक्षात आली. 'इतिहास, पुराणे, कुटुंब, गाणी, संघर्ष' हा मसाला घेऊन त्यांची चित्रपटात गुंतवणूक चालू केली. त्यातून त्यांनी बराच पैसा कमावला. या 'मसाल्याला' यश मिळते हे लक्षात आल्यावर, त्याचीच पुनरावृत्ती करणे सोपे होते. तेच सुरू झाले. तिथे या मसाल्यात 'सेक्स आणि गुन्हेगार' यांची भर पडली. समाजामध्ये परिवर्तन करण्याचे सामर्थ्य असणाऱ्या या कलेला निव्वळ बाजारू स्वरूप आले.

दुसऱ्या महायुद्धाचा काळ. अशा मसाला-फॉर्मुल्येबाज चित्रपटांचा कंटाळा हा साऱ्या जगभर आलेला होता. प्रेमप्रकरणे, कारस्थाने, गाणी, सेक्स, मारधाड हा एक टिपिकल मसाला-फॉर्मुला तयार झालेला होता. याला कंटाळून १९४८ साली पहिला वास्तववादी समांतर चित्रपट इटलीमध्ये तयार झाला (बायसिकल थीव्ज). थेट लोकेशनमध्ये जाऊन शुटींग, अनोळखी चेहरे, साधी-सरळ कथा आणि एकूणच प्रामाणिक धाटणी! इकडे भारतातही स्थिती काही वेगळी नव्हती. पुराणकथा, संगीत, नाटक, संगीत नाटक, विनोद, गाणी एक सिद्ध मसाला बनलेला होता. मात्र, बंगालमधील सत्यजित राय, हे या मसाल्यापेक्षा नवं काही करू पहात होते. चित्रपट ही कला आहे आणि तिच्या माध्यमातून आपण लोकांशी संवाद साधू शकतो हे त्यांच्या लक्षात आलेले होते. त्यांना त्या इटालीयन चित्रपटातून मार्ग सापडला. यातून त्यांनी १९५५ला वास्तववादी चित्रपट काढला पाथेर पांचाली, चित्रपट हा, रेकॉर्ड/कॅसेट कंपन्या आणि धनदांडग्यांचा नसून : दिग्दर्शकाचा असतो-लोकांचा असतो हे ठामपणे त्यांनी सिद्ध केले.

नंतर भारत सरकारनेही आपले चित्रपटधोरण ठरवले. मसालेदार भंपक सिनेमा आणि 'निष्क्रिय मनोरंजनापेक्षा'; लोकांशी संवाद साधणारे,लोकांची भाषा बोलणारे, लोकांशी जवळीक साधणारे असे चित्रपट आपल्या देशात निर्माण व्हायला पाहिजेत असे जाहीर केले. आपल्या देशात समांतर चित्रकलेची, नाटकांची लाट उदयास आलेली होती; साहित्य तयार होत होते. प्रतिभावंत होते, निर्मिक होते. मग, चित्रपट का बनू शकत नाहीत? हा प्रश्न होता. अर्थात, 'बजेट' ही एक मोठी समस्या होती. प्रशिक्षण ही दुसरी समस्या. त्यामुळे, सरकारनेच फिल्म फायनान्स कॉर्पोरेशन (FFC) निर्माण करून, निधी पुरवायला सुरवात केली, तर 'फिल्म्स-टेलिव्हीजन' ही संस्था स्थापन करून, प्रशिक्षणाचा सोय केली. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव नियमितपणे भारतात भरू लागले होते. देशी-विदेशीचे उत्तम चित्रपट आता पाहता येऊ लागले. तेथील दिग्दर्शकांशी संवाद सुरू झाला. अशा प्रकारे, अर्थपूर्ण सिनेमाची संस्कृती विकसित होण्याची सर्व पार्श्वभूमी १९५५ ते १९७० पर्यंत तयार झालेली होती.

या सर्व प्रयत्नांना १९६९ साली मृणाल सेन यांचा 'भुवन शोम' हा पहिला समांतर हिंदी चित्रपट आला. टिपिकल फॉर्म्युल्याला मोडून काढून ; एक साधी कथा,

---

जीवनात यश कायम नसते. तसेच अपयशही अंतिम नसते. जोवर तुमचा विजय इतिहास बनत नाही तोवर प्रयत्न करणे थांबवू नये.

प्रामाणिकपणे इथे मांडली होती. इथून समांतर चित्रपटांची एक लाट निर्माण झाली. तिकडे, पूर्वीच्या सरकारी संस्थेचे रूपांतर १९८० मधे, एन.एफ.डी.सी. (NFDC) मध्ये झालं. त्यांच्या निधीतून, भारतभर चित्रपट निर्माण होऊ लागले. या चित्रपटांना मिळणारा प्रतिसाद पाहता; या उत्साहात, 'ब्लेझ' सारखे खाजगी निर्मातेही उतरले, काही साहित्यिकांनी/रंगकर्मीनी तर स्वत: निर्मिती करायला सुरुवात केली. मणी कौलचा 'उसकी रोटी' (७०), एम. एस. सत्थुचा 'गर्म हवा' (७४), श्याम बेनेगलचे 'अंकूर' (७४), 'निशांत' (७५). 'मंथन' (७६) हे त्या काळातील महत्त्वाचे अर्थपूर्ण चित्रपट. मराठीतील पहिला समांतर चित्रपट 'शांतता कोर्ट चालू आहे' (७१) हा सत्यदेव दुबेंनी आणला. अर्थात इथे 'चित्रपट' हे माध्यम असले तरी, याचा मूळ प्राण आणि भाषा सुद्धा 'नाटक' च होत. मात्र, ७९ साली आलेला, नचिकेत-जयू याचा '२२जून १८९७' हा चित्रपट हा एक महत्त्वाचा चित्रपट ठरला. हा मराठीतील चित्रपटाची खास भाषा असलेला पहिला समांतर चित्रपट होय. तर, 'संस्कार' (७०), 'घटश्राद्ध' (७७) कन्नडमधे आणि 'स्वयंवरम' (७२) मल्याळममध्ये आला. या निमित्ताने बेनेगल, गिरीश कर्नाड, गिरीश कासारवल्ली, अदूर गोपालकृष्णन असे प्रतिभावान दिग्दर्शक मिळाले.

एका बाजूला मसाले चित्रपट गर्दी खेचत असताना, असे अर्थपूर्ण चित्रपट रसिकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेत होते. म्हणून, त्यांना 'समांतर चित्रपट' असे म्हणले जाते. यामध्ये वास्तववादी, समाजाच्या त्रुटीवर भाष्य करणारे चित्रपट होते. तसेच, कलात्मक चित्रपटही होते. त्यामुळेच, या चित्रपटांना 'कलात्मक चित्रपट' (Art Film) असेही म्हणाले जाते.

समांतर चित्रपटांनी ही जी तुतारी फुंकली ती अत्यंत प्रभावी होती. एका बाजूला, साहित्यिक, रंगकर्मी यांना एक अप्रतिम असे नवे माध्यम मिळाले. तर दुसरीकडे, गाणी-बजावणी 'स्टार' बाजीने वैतगलेल्या चित्रपट रसिकांनी एक सुटकेचा श्वास सोडला. १९६९ साली सुरू झालेली ही चळवळ, अशी ७० च्या दशकात उत्साहाने सळसळू लागलेली होती.

पुढे ८० च्या दशकात ही समांतर चित्रपटांची चळवळ खूपच पसरली, शुद्ध भारतीय सिनेमा म्हणून तिचे जगात एक स्थान निर्माण झालं. उत्तम दिग्दर्शकांचे अविस्मरणीय काम या काळात दिसून आले. गोविंद निहलानी यांचा 'आक्रोश'(८०) आणि 'अर्धसत्य' (८३), बेनेगल यांचा 'मंडी'(८४), कुंदन शहा यांचा 'जाने भी दो यारा' (८३), गौतम घोष यांचा 'पार' (८४), केतन मेहता यांचा 'मिर्च मसाला' (८७) हे या काळातील महत्त्वाचे चित्रपट होत.

अर्थात, बॉलिवूडच्या मसालासिनेमाचे आव्हान कायम होतेच. त्याचबरोबर, प्रादेशिक चित्रपटांमध्येही तिथली 'मसाल्यांची' आव्हानं होतीच. 'लोकांना बिलकुल डोकं नसतं' या मुलभूत सिद्धांतावर हे मसाले चित्रपट उभे होते. विशेषत: ९०च्या दशकात हे खूप जाणवलं. 'समांतर सिमेमा' हा टिकतोय का नाही? हाच प्रश्न निर्माण झाला. किमान १० वर्षे तरी अशी अस्वस्थतेची होती. अर्थात, या काळातही बेनेगल 'सुरज का सातवा घोडा' (९२), निहलानी 'हजार चोरासी कि मां' (९८) असे मजबूत चित्रपट घेऊन आलेले होते. वास्तवदर्शनापलीकडे, कलात्मकतेची मजबूत किनार या चित्रपटात होती. तर, मराठीमध्ये भावे-सुकथनकर या जोडीने 'दोघी' (९५) हा चित्रपट आणला. आणि सचिन महेश यांच्या विनोदी (?) चित्रपटांच्या गर्दीमध्ये नवं काही घडू पाहत आहे याची जाणीव करून दिली.

मात्र, २००० नंतर, समांतर सिनेमामध्ये एक नवी

---

या जगात तुमच्या यशाच्या वाटेवर लोक नेहमीच दगडफेक करतील. पण त्या दगडांपासून भिंत बनवायची की पूल बांधायचे ते तुमच्यावरच अवलंबून आहे.

लाट आली, यामध्ये काही सिनेमे 'समांतर' होते तर काही 'मसाला-समांतर' अशा घाटणीचे. या मंथनातून, भारतीय उत्तम सिनेमा निर्माण झाला. आणि उत्तरोत्र वाढत चाललेला आहे. संदीप सावंत यांच्या 'श्वास' (२००४) ने मराठीमध्ये 'समांतर' चित्रपटाची वाट पुढे नेली. 'आशय प्रधान समांतर चित्रपट' अशी मराठी चित्रपटांची जी जगभर ओळख पुढे निर्माण होणार होती तिचा प्रारंभ 'श्वास'ने झाला. मग, मराठी चित्रपटांनी मागे वळून पाहिलेच नाही. आजपर्यंत!

भावे-सुकथनकर यांचा 'बांधा' (२००६), उमेश कुलकर्णी यांचा 'वळू' (२००८) आणि 'विहीर' (२००९) मंगेश हाडवळे यांचा 'टिंग्या'(२००८), हेच दमदार पाउल २०१० च्या दशकात अजून झेपावले. नागराज मंजुळे यांचा 'फ्यांड्री' (२०१३), अविनाश अरुण यांचा 'किल्ला' (२०१४), परेश मोकाशी यांचा 'एलिझाबेथ एकादशी' (२०१४), चैतन्य ताम्हाणे यांचा 'कोर्ट' (२०१५), भाऊराव कऱ्हाडे यांचा 'ख्वाडा' (२०१५), भावे-सुकथनकर यांचा 'कासव' (२०१६) हे मराठीतील काही अप्रतिम चित्रपट. तर, हिंदीमध्ये अनुराग कश्यपचा 'अग्ली' (२०१३), अमित मसुरकर यांचा 'न्यूटन' (२०१८) यांनी धमाल उडवून दिलेली होतीच.

अर्थात, अडचणी आहेत. वितरक-थिएटर न मिळणे ही त्यातील मुख्य अडचण. मार्केटिंगही फारसे चांगले होत नाही. 'प्रेम-कुटुंब-गाणी आणि मारामारी म्हणजेच सिनेमा' या समीकरणाने अजूनही पकड सोडलेली नाही. ती लवकर सुटेल असेही वाटत नाही. मात्र, दुसरीकडे 'समांतरपणे' उत्तम काम चालू राहिले पाहिजे हे महत्त्वाचे!

ते होत आहे. निष्ठेने निर्मिती चालू आहे. हिंदीबरोबरच, मराठी, मल्याळी, बंगाली या चित्रपटांनी जोर पकडलेला आहे. विविध फिल्म सोसायटींनी, महोत्सवानी इंटरनेटवरील खाजगी वाहिन्यांनी त्यांना आधार दिलेला आहे. 'सिनेमा'वर मोठ्या प्रमाणात लिहिलं जाऊ लागलेले आहे. फेसबुकवर सातत्याने चर्चा चालू आहे. आता किल्ला, नाळ, आर्टिकल १५ सारखे चित्रपट लोक थिएटरमधे जाऊन पाहू लागले आहेत. 'उत्तम प्रेक्षक होण्याची', 'अभिरुचीचा स्तर बदलण्याची' प्रक्रिया मजबूत होते आहे. यामुळे 'उत्तम चित्रपट' निर्माण करण्याचा उत्साह वाढतो आहे, हे आज एक चांगले चित्र आहे.

याची सुरवात झाली भुवन शोम पासून १९६९ साली म्हणूनच, २०१९ हे वर्ष 'समांतर चित्रपटांची ५० वर्षे' असे साजरे करण्यासारखे.

**- डॉ. निरंजन कुलकर्णी**
कार्यक्रम संयोजक सांगली फिल्म सोसायटी

●●●

**दिशासाठी**

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# सावरकरांचा माफीनामा : समज आणि वास्तव

*राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या बद्दल केलेल्या आक्षेपार्ह विधानामुळे एकूणच वातावरण तापलेले असताना सावरकरांनी जे पत्र ब्रिटिशांना लिहिले त्याचा साक्षेपी धांडोळा घेणारा संकेत कुलकर्णी यांचा लेख – संपादक*

आज सहज आठवलं – १९२० साली 'द सेकंड कमिंग' कवितेत डब्ल्यू बी यीटस ह्या इंग्लिश कवीने एक वाक्य लिहिले आहे – तो म्हणतो ... The best lack all conviction, while the worst are full of passionate intensity.... हुशार आणि विचारवंत मंडळी काहीशा संभ्रमात आहेत तर बिनडोक मंडळी कसल्यातरी फाजील आत्मविश्वासात आहेत. सध्या भारतातल्या लोकांची अशीच काहीतरी अवस्था झालेली आहे. नाही का? आणि हे का होतंय? तर कोणीही सोम्यागोम्या उठतो आणि सवंग प्रसिद्धीसाठी कोणत्यातरी मोठ्या माणसावर आत्मविश्वासाने चिखलफेक करतो. त्याची पिलावळ त्याचीच भलावण आणि पुढे अनुकरण करते. एकाचे दोन आणि दोनाचे दहा होतात. हे पुढेपुढे वाढतच जातं.


पण जे सुशिक्षित सारासार विचार करणारे लोक आहेत ते हे सर्व आजूबाजूला पाहून अजूनच कोषात जातात. कारण? त्यांना माहीत असतं की जे चाललंय ते चुकीचं आहे. मोठ्या माणसांबद्दल जे काही बोललं जातंय ते चुकीचं आहे. हे कुठेतरी बदलायला हवंय असं वाटत असतं. पण हे नुसतं वाटून काय फायदा? त्यांच्याजवळ काहीच पुरावे किंवा अभ्यासाची साधने नसतात आणि बोलणारे तर ह्या आविर्भावात बोलत असतात की जणू तेच नवा इतिहास पुढे आणत आहेत. पण खरंच असं होत असतं का? तर नाही. जसं हुशारीला मर्यादा असते पण मूर्खपणाला नसते – त्याप्रमाणेच कितीही कळकळीने सांगितलं तरीही खरा इतिहास सांगायला मर्यादा आहेत – पण खोट्या कंड्या पिकवायला मात्र स्काय इज द लिमिट!

सावरकरांचे माफीनामे हे त्यातलंच एक प्रकरण. संपूर्ण स्थावरजंगम मालमत्तेची जप्ती आणि ५० वर्षांसाठी अंदमानात दोन जन्मठेपा – ह्या शिक्षा संपूर्ण भारताच्या इतिहासात फक्त आणि फक्त ह्या एका माणसाला झालेल्या आहेत. नुसत्या माफीनाम्यांवर हे सगळं परत द्यायला इंग्रज सरकार इतके बिनडोक होते का? बरं; इतकी शिक्षा होऊनही हा माणूस खचत नाही. नाउमेद होत नाही. शिक्षा सोसतो. ती भोगत असताना ह्याच्या मनांत एकच सल असतो की आपल्याला मातृभूमीची सेवा करता येत नाहीये. तुरुंगवासात वेळ वाया जातोय. आयुष्य वाया जातंय कारण ते देशकार्यासाठी कामाला येऊ शकत नाहीये. काहीही करून पुन्हा भारतभूमीत जाणं भाग आहे. अंदमानात इतरही राजबंदी आहेत. देशद्रोह केला म्हणून इंग्रजांनी त्यांनाही अंदमानात पाठवलेले आहे. जर ही सगळी मंडळी इथेच खितपत पडली तर सर्वसामान्य लोकांचे नेतृत्व कोण करणार? त्यांना योग्य तो मार्ग कोण दाखवणार? ह्यासाठी काही अटींवर का असेना पण कसंही करून पुन्हा भारतात जाणे क्रमप्राप्त आहे. इतका सरळ विचार आणि मग त्यासाठी प्रयत्न. कारागृहात राहून जी करता येत आहे त्याहून काही प्रमाणात अधिक, प्रत्यक्ष सेवा या आमच्या मातृभूमीची करता येईल, अशा प्रकारच्या कोणत्याही अटी मान्य करून मुक्तता करून घेणे हे प्रतियोगी धोरणानेच नव्हे, तर समाजहिताच्या दृष्टीनेही आमचे परम कर्तव्य

जे लोक काहीच करीत नाहीत, त्यांच्या हातून चुका होत नाहीत.

आहे – असं सावरकर स्वत: 'माझी जन्मठेप' मध्ये लिहितात!

मग हे प्रयत्न कसे करायचे? तर छुप्या क्रांतिकारक मार्गांनी आणि सनदशीर मार्गांनी सरकारला निवेदनं पाठवून. त्यांच्या क्रांतिकारक प्रयत्नाबद्दल सर रेजिनाल्ड क्रॅडॉकने १९१३ मध्येच लिहून ठेवले होते की ...ते (सावरकर) असे महत्त्वाचे पुढारी आहेत की, हिंदी अराजकवाद्यांचा युरोपियन विभाग त्यांच्या सुटकेसाठी कट करील नि तो कट त्वरेने रचला जाईल.... पहिल्या महायुद्धाचे पडसाद उमटू लागले होते. ह्याच सुमारास जर्मन युद्धनौका 'एम्डेन'ही अंदमानभोवती चकरा मारत होती. हा योगायोग नक्कीच नव्हता.


COPY.

To

His Honour, the Secretary to the Government of India,
Home Department.

Dated Port Blair, Cellular Jail the 5th October 1917.

May it please your Honour;

Some three years ago, in 1914 I had sent a petition on the following points to the Government of India; and Lord Hardinge was pleased to let me know that it was "impossible"- not that the Government was unwilling, to give effect to my proposals under the then circumstances.

The war, and all that X it means, has definitely and materially changed the political relations of almost all peoples and states. A new spirit has manifested itself in man and whole nations are being roused and animated by new visions and new hopes, which have found responsible and glowing expressions in the utterances of presidents of Republics and Ministers of Empires. Neither India nor the British Empire as a whole could have remained unaffected by this great Democratical upheaval in the world. In them too old order of Race-domineerings and Race-subjections is giving place to that of Co-operation and common-wealth. The nucleus of an Empire-cabinet; the presence in it of the ministers of the colonies and two representatives though nominated, of India; the permission to be enrolled as volunteers to the Indian youths; the throwing open of commissions in the army; the great speech of the Premier in which he declared that the supreme test of the British Statesmanship would depend on the extent to which it succeeds in making the millions of Indians feel- not a sense of dependence- but that of "real partnership"; and to crown all the most important, definite and determined declaration by the present Secretary of State, not only

as

© संकेत कुलकर्णी (लंडन)

बाहेरून हे प्रयत्न सुरू असताना सावरकरही सरकारला पत्रं लिहून कळकळीने सांगत होते की आता काळ बदलतोय. राजबंद्याना जगातली कोणतीही सरकारे तुरुंगात ठेवत नाहीत. मला नाही तर निदान इथल्या इतर राजबंद्यांना सोडा. जर सरकारसाठी मला सोडणे बाकीच्या राजबंद्यांसाठी अडचणीचे ठरत असेल तर मला न सोडता बाकी सर्वांना सोडा. माझ्या स्वत:च्या सुटकेइतकाच आनंद मला होईल. हे ज्यात लिहिलेय ते हे ५ ऑक्टोबर १९१७ चं पत्र (किंवा माफीनामा म्हणूयात) संपूर्ण देतोय. वाचून पहा. कोणत्याही प्रकारे सावरकर असं लिहीत नाहीयेत की मला सोडा आणि मी तुम्हाला बाकीच्यांची नावे सांगतो किंवा माफीचा साक्षीदार होतो.

काही पढतमूर्खांना ह्यात लिहिलेले मायने May it please your honour किंवा I am your most obedient हे वाचून आनंदाच्या उकळ्या फुटतील. सावरकर इंग्रजांसमोर लोटांगणं घालत होते किंवा पाय धरत होते असं वाटेल. तसं वाटून घेऊ नये. ही फक्त पत्र लिहायची पद्धत होती. उदाहरणच द्यायचं झालं तर गांधीनीही कधीही न भेटलेल्या हिटलरला Dear friend आणि I remain your sincere friend ह्या मायन्याने वर्ध्याहून लिहिलेले पत्र सुप्रसिद्ध आहेच. ह्या पत्रामुळे गांधींना 'नाझी' ठरवणे जितके हास्यास्पद आहे, तितकेच सावरकरांची ही पत्रे किंवा माफीनामे पाहून त्यांना 'माफीवीर' ठरवणे आहे.

बरं; सावरकरांच्या पत्रांना इंग्रज फसले नाहीत बरं का! सावरकर भारतातून लंडनला शिकायला यायच्या आधीच भारतातून लंडनला तार गेलेली होती की, ह्याच्यापासून सावध रहा आणि बारीक लक्ष ठेवा. मग तुरुंगात आल्यावर काय ते सोडणार आहेत सहजासहजी? इंग्रज सरकारने सावरकरांना शिक्षेत कोणतीही सूट दिली नाही. एकूण २०-२२ वेळा आडव्या बेड्या, उभ्या

(पृष्ठ क्र.३४ वर)

भरती, ओहोटी आणि वेळ कोणासाठी थांबत नाही.

# शैक्षणिक सहल : जपान

*विद्या प्रसारक मंडळाने आयोजित केलेल्या जपान शैक्षणिक सहलीचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे - संपादक*

''उगवत्या सूर्याचा देश जपान'', हे शालेय जीवनापासून माहिती होतं. हिरोशिमा-नागासाकी येथे अणुबॉम्ब पडल्यानंतर फिनिक्स पक्षासारखी राखेतून भरारी घेणारं जपानचे चित्र डोळ्यांसमोर उभे रहातं. २०१२ साली क्योतो सांग्यो या महाविद्यालयातील विद्यार्थी व्ही. पी. एम. बेडेकर कॉलेजमध्ये कल्चरल एक्सचेंज प्रोग्रामसाठी एकत्र येऊ लागले. आणि त्या विद्यार्थ्यांना योग शिकविण्याची जबाबदारी डॉ. बेडेकरांनी माझ्यावर सोपविली. तेव्हापासून जपान देश आणि जापानी लोकांबद्दल ओढ वाढून बऱ्याचशा गोष्टी कळू लागल्या, उलगडू लागल्या. माझ्यासाठी पर्यटन हे केवळ झाडं, पानं, इमारती बघणे नव्हे; तर त्या मातीतली संस्कृती, लोकं, त्यांचे स्वभाव यांच्याबद्दल जाणून घेणे होय. आणि म्हणूनच जेव्हा कॉलेजकडून जपानला जाण्याचे ठरले तेव्हा ताबडतोब 'हो' म्हणून मी मोकळी झाले. मनाशी असलेलं आकर्षण कुठेतरी प्रत्यक्षात उतरणार होत. टूर्स अँड ट्रॅवेल्स सोबत आपण केव्हाही अन् कुठेही जाऊ शकतो; पण प्रत्यक्षात तिथल्या लोकांमध्ये रहाणे, त्यांच्यासोबत वावरणे, त्यांना व त्यांच्या चालीरीती समजून घेणे हे फारच महत्त्वपूर्ण वाटलं. म्हणूनच जपानला जाणं आनंददायी वाटलं. १८ नोव्हेंबरला रात्री निघालो, सिंगापूरचा ५ तासांच्या ब्रेक धरून २२ तासांचा प्रवास.

'सिंगापूर' एक छोटंसं शहर. अलीकडेपर्यंत ते पारतंत्र्यात होतं. त्यांच्याकडे नैसर्गिक साधन संपत्ती काहीच नाही, परंतु अशा नकारात्मक गोष्टींमध्ये न अडकता त्यांनी त्यांच्या सकारात्मक गोष्टींचा शोध घेतला आणि त्यातूनच त्यांच्या लक्षात आले की, त्यांचे भौगोलिक अस्तित्व अशा ठिकाणी आहे की, तेथून जगभरातील विमाने जाऊ शकतात. त्यांनी जगभरात विमानसेवा देण्यास सुरवात केली. आणि आज ते उच्चांकावर पोहोचलेही. आदरणीय डॉक्टर आगरकर सर यांनी ही इत्यंभूत माहितीही पुरवली. सिंगापूर विमानतळ प्रचंड मोठे आणि प्रेक्षणीय आहे.

२२ तासांच्या प्रदीर्घ प्रवासानंतर जपानच्या भूमीवर पहिलं पाऊल ठेवलं ते ओसाका विमानतळावर. प्रचंड थंडी, तापमान १० डीग्री. त्यात भन्नाट वारा. क्षणार्धात आम्ही अगदी गारठून गेलो. पण त्यातही आम्ही पोहोचल्याबरोबर जपानच्या क्योटो युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर डॉ. शिगा आणि त्यांची टीम विमानतळावरच भारतीय तिरंग्यासोबत आमच्या स्वागतासाठी तैनात होती. स्वागतानंतर विमानतळाजवळच्याच मेट्रो ट्रेनने आम्ही दोन स्टेशनं गेलो आणि एका मोठ्या हॉटेलमध्ये विसावलो. सकाळी उठल्यावर जपानचे खरे दर्शन झाले. ओसाका विमानतळ समुद्रात कृत्रिम बेट तयार करून बांधलेलं, त्यामुळे त्याच्या तीन बाजूला समुद्र आहे. सकाळी आम्ही प्रायवेट बसने क्योटोला निघालो. ह्या दोन तासांच्या प्रवासात सर्वजण जपान पाहण्यात गुंग होतो. खरे तर सकाळची गर्दीची वेळ होती परंतु धांदल धडपड किंवा ट्राफिक जाम दिसला नाही, गाड्या भरपूर होत्या पण गाड्यांचा हॉर्न नाही की कुठे साधे ओव्हरटेक ही नाही. एका विशिष्ट अंतराने सर्व गाड्या चालत होत्या. शिस्तबद्ध ड्रायविंगचे दर्शन घडले. शिवाय ज्या दिशेला पहावे तिथे कमालीची स्वच्छता. दोन तासांच्या प्रवासानंतर आम्ही क्योतो सांग्यो युनिव्हर्सिटी इंटरनॅशनल हाऊस ह्या त्यांच्या युनिव्हर्सिटी हॉस्टेलमध्ये उतरलो.

स्वप्नं ती नव्हेत जी झोपल्यावर पडतात, तर स्वप्नं ती असतात जी झोपूच देत नाहीत.

तेथे पोहोचल्या बरोबर सर्वप्रथम त्यांनी आमची पादत्राणे काढून लॉकर मध्ये ठेवायला सांगून त्यांच्याकडून सर्वांना एकसारख्या चप्पलस् दिल्या ज्याचा वापर फक्त आणि फक्त होस्टेलपुरता मर्यादित होता, घरी असावं असं. नीरव शांतता आणि शिस्त.



तिथून आम्ही क्योटो शहर बघायला बाहेर पडलो. बुद्धांचा प्रभाव जपानवर असल्याने तिथे जुनी बुद्ध मंदिरं खूप आहेत. पागोडा पद्धतीने बांधलेली. काही ठिकाणी बुद्धांच्या जुन्या काळातील मूर्ती होत्या आणि त्याच बरोबर काही हिंदू देवता सुद्धा होत्या. असं दिसतं की एकूणच भारतीय देवता तिथे पोहोचल्या होत्या. सात मजली पागोडा होता, ते जुनं बुद्धामंदिर होतं. एक सुंदर गोल्डन टेम्पल आहे, संपूर्ण मंदिर वरपासून खालपर्यंत सोनेरी रंगाचं आहे. त्याचा परिसर खूप सुंदर आहे. तिथे खूप वेगवेगळ्या रंगांची झाडे आहेत.

जपानचा मूळ धर्म आहे शिंतो. त्यांच्या मंदिरांना श्राईन (shrine) म्हणतात. फुशिमी इनारी ताईशा या नावाचं एक श्राईन (shrine) बघितलं. उंच डोंगरावर वसलेली देवी आहे. श्राईनमध्ये मूर्ती नाही. आणि जाणारा सगळा रस्ता खूप सुंदर असतो. दोन्ही बाजूंनी रंगीत बांबू लावलेले होते, चालायला पण मजा येते. तिथे बरीच तरुण नवविवाहित जोडपी पारंपरिक जपानी वेश (किमोनो) परिधान करून दर्शनाला आलेली दिसली. खूप सुंदर दिसत होते.

परत हॉस्टेलवर आलो. तिथले विद्यार्थी आमच्यासाठी जेवण बनवत होते. थोड्याच वेळाने डॉक्टर शिगा आणि प्रोफेसर यासुका मियागावा पण आले. जातीने सर्व काही बघत होते. त्यांनी आमच्यासाठी शाकाहारी जेवणाची सोय केली होती, ज्यात वरण भात, भजी, गुलाबजाम आणि वेगवेगळ्या पद्धतीचे पदार्थ पानावर होते. आमच्यासाठी सुखद आश्चर्याचा धक्का होता तो!

दुसरा दिवस फार महत्त्वाचा होता. आज क्योटो सांग्यो विद्यापीठात भेट होती. चालत १५ ते २० मिनिटांवर विद्यापीठ होतं. अतिशय सुंदर, निसर्गाच्या कुशीत वसलेलं. जरासा डोंगरावर जाणारा रस्ता, छोट्या छोट्या इमारती, अतिशय सुंदर आणि स्वच्छ रस्ते. सर्व प्रथम आम्हाला वेधशाळा (observatory) बघायला नेलं. डॉ. बेडेकर व डॉ. आगरकर यांची प्रेसिडेंट बरोबर भेट होती. अचानक शिगा सरांनी मला सांगितलं की, मला आणि अथर्व देशपांडे (हा जपानी भाषा शिकत असलेला विद्यार्थी आणि संपूर्ण जपान प्रवासात बरेचदा दुभाष्याचा काम करणारा) यालासुद्धा आमंत्रण आहे! मला खूपच आनंद झाला, म्हणजे शब्दात वर्णन नाही करू शकत माझ्या भावना. ती भेट १५ ते २० मिनिटे चालली. फारच वेगळा अनुभव होता तो माझ्यासाठी. मिटींग संपवून आम्ही खाली आलो. त्यानंतर आम्हाला वाचनालय (Library) आणि तेथे जोडूनच असलेल्या सभागृहात नेले. तिथे आम्हा भारतीयांसाठी विशेष अप्रतिम शब्दांमध्ये स्वागतार्ह भाषण झाले. बेडेकर महाविद्यालय, भारत आणि क्योतो महाविद्यापीठाच्या संबंधित माहिती दिली. जपानी विद्यार्थी आणि प्रोफेसर यांनी त्यांचे पारंपरिक वाद्य वाजवित श्रवणीय गायन सादर केले. त्याचसोबत एका बाजूला फुलांची विशेष मांडणी कशी करतात ते थेट प्रात्यक्षिक करून दाखविले. त्याला 'ईकेबाना' (Flower arrangement) म्हणतात;

ज्याला आध्यात्मिक अर्थही होता. शेवटी आभार प्रदर्शन झाले. अतिशय सुखद अनुभव होता तो.

विद्यापीठाच्या आवारात मध्यभागी एक मोठे मैदान होते जिथे जपानी विद्यार्थ्यांनी आमच्यासाठी त्यांचे एक पारंपरिक नृत्य सादर केले. साधारण ३५ जण सहभागी होते. मैदानात उघड्यावर सुद्धा अगदी सहज बेमालूमपणे त्यांच्या कपड्यांचे रंगही बदलत होते. त्यांच्या कपड्यांची रचनाच अशी होती की, जणू ते कपडेच बदलत होते असे भासत होते. नृत्यानंतर आम्हाला एका कॉन्फरन्स गृहात नेण्यात आले. जिथे जपानी शाकाहारी पद्धतीचे भोजन (OBENTO, Lunch Box) देण्यात आले. बहुतांश पदार्थांमध्ये रताळ्याचा वापर करण्यात आला होता. त्यानंतर भारतात येऊन गेलेले विद्यार्थी आणि प्रोफेसर एका बाजूला आणि आम्ही भारतीय एका बाजूला अशा सुरेख व्यवस्था केलेल्या गृहात संस्कृतिक माहिती आणि परस्परांना आलेल्या अनुभवांची देवाणघेवाण प्रस्तुत झाली. जपानी विद्यार्थ्यांनी सांगितलेले अनुभव फारच मजेशीर होते. गणेश उत्सवाची भरभरून स्तुती झाली अन् आपल्याकडील खाद्यपदार्थांवर बरे-वाईट अभिप्राय ऐकण्यातही मजा आली.

जपानचा विशेष 'टी सेरेमनी' (Tea Ceremony) जी जपानी शिष्टाचाराची एक महत्त्वपूर्ण प्रथा आहे, त्याचा लाभ घेतला. इथे चटईवर खाली बसून चहा घ्यावयाचा असतो. आधी एक मोठ्या पेढ्यासारखा गोड पदार्थ छोट्याशा पांढऱ्या कापडावर वाढला जातो. सोबत 'माचा चहा' (Macha Tea) सर्व्ह केला जातो. हा चहा थोडासा कडवट आणि हिरव्या रंगाचा असतो. साधारण आपल्याकडील काढ्यांसारखा. अगोदर अर्धा गोड पदार्थ खावयाचा असतो आणि माचा टी प्यायचा, नंतर उरलेला अर्धा गोड पदार्थ खावयाचा. हा गोड पदार्थ खाताना सर्वांना आपल्या पुरण पोळीची आठवण मात्र झाली. चहा थोडा कडवट जरी असला तरी औषधी असल्याचं जाणवलं. ह्या सर्व गोष्टी शांतपणे आणि अतिशय आदराने करतात. आणि विशेष म्हणजे चहा आणि गोड वाढणारी व कप उचलणारी व्यक्ती, दोघांचे आदराने, मान खाली झुकवून, हात जमिनीवर ठेऊन आभार प्रकट करतात. अशी ही एक अत्यंत आदरपूर्वक प्रथा म्हणजे 'टी सेरेमनी'. हे करतांना आपल्याकडील नाक्यावरच्या कटिंग चहाची आठवण मात्र आपसूकच डोक्यात येऊन जाते.



त्यानंतर एका प्रशस्त हॉलमध्ये योग प्रशिक्षण आयोजित केले गेले होते. आम्ही तिथे योगवर्ग घेतला. एकूण १९ विद्यार्थी मुले-मुली व एक प्रोफेसर हजर होते. त्यांना योगमुद्रा, योगक्रिया आणि ध्यान शिकविण्यात आले. विशेष म्हणजे आम्ही तयारी करून गेलो असल्यामुळे जपानी भाषमध्येच वर्ग घेतले, ज्याचे त्यांनीही कौतुकच केले. साधारण तासाहून अधिक वेळ योग वर्ग चालला. परंतु वेळेअभावी आटोपतं घ्यावं लागलं. त्यावेळात इतर विद्यार्थी विद्यापीठातील अद्ययावत वाचनालय पाहावयास गेले. उशीर झाल्याने निघतांना घाई झाली अन् पळापळ करीतच आम्ही पुन्हा हॉस्टेलकडे निघालो, पण आमच्यापैकी काही आपापल्या काही वस्तू युनिवर्सिटीतच विसरले (जसे कॅमेरा बॅग, चष्मा कव्हर, शाल) अन् तेही वेगवेगळ्या ठिकाणी. परंतु जे ऐकले होते तेच प्रत्ययास आले की जपान मध्ये कधी कुठलीही वस्तू हरवत नाही. सावोरी आणि युमी ह्या दोन्ही जपानी मुली एअरपोर्टपासून आमच्या सेवेशी

होत्या. त्यांनी त्यांची यंत्रणा कामाला लावून सर्व वस्तू आमच्यापर्यंत पोहोचविल्या.

माझ्या विनंतीनुसार प्रोफेसर यासुका मियागावा, ज्या आपल्या ठाणे विद्यापीठातही येऊन गेलेल्या होत्या त्यांनी तिथल्या एक प्रसिद्ध झेन मोंक केहो निशिगाकी यांची भेट योग आणि अध्यात्मासंबंधीच्या चर्चेसाठी भेट निश्चित करून ठेवली होती. थोडा उशीर होणार होता पण मी तर फारच खूश झाले होते. या वेळात इतर सदस्यांची डॉ. बेडेकर सरांनी शाळा घेतली व बऱ्याचशा विषयांवर चर्चा केली. आम्हाला उशीर झाल्यामुळे आम्ही हॉटेलवर सामान टाकलं. या लॉजचं नाव होतं ओकलॉज!! मग मी दीपालीला सोबत घेऊन यासुका मॅडम बरोबर ट्रेनने मोंककडे गेलो. जाताना वाटेत जपान मधील सर्वसामान्यांचे रोजचे शिस्तबद्ध जीवन बघायला मिळाले. अतिशय छोटंसं शहर, नव्हे गावच, पण तेथील स्टेशन्स अतिशय नीटनेटकी आणि स्वच्छ होती. ट्रेनमध्ये चढणे-उतरणे अगदी शिस्तीत होते. साधारण ८.३० ला आम्ही तिथे पोहोचलो. आदरणीय मोंक स्वत: आमच्या स्वागताला स्टेशनवर आले होते. फारच अंधार होता. अगदी खेडेगावसारखे दिसत होते अन् अतिशांतता होती. गेल्याबरोबर प्रथम त्यांनी त्यांच्या पद्धतीचा गरम चहा दिला. योग आणि ध्यान यावर बऱ्याचशा गप्पा झाल्या, बरीचशी वेगळी माहिती प्राप्त झाली. नंतर त्यांनी आमचे झेन पद्धतीने 'झेन मेडीटेशन' करून घेतले. एक वेगळाच आनंद मिळाला. ९.५० ला त्यांचा निरोप घेतला. साधारण १०.३० ला परत हॉटेलवर पोहोचलो. दिवसभरच्या भरगच्च कार्यक्रमाने माझं पोट अन् मन भरलं होतं. वेळ कसा गेला कळलेच नाही. परत पोहोचल्यावर सर्व सदस्यांना हॉटेलच्या लॉबी मध्येच भेटले जेथे डॉ बेडेकर सरांचे लेक्चर चालू होते. थोड्याशा ऐकण्यावरून मी तेही लेक्चर मिस केल्याचं मनाला वाटलंही. पण.....

तिसरा दिवस उजाडला. सरांनी नारा शहर पहाण्यासाठी बसने फिरण्याचे आयोजित केले होते. चार बुद्धिस्ट मंदिरे होती. होरजोई, जिकोईन, याकुशीजी, तशोदाजी आणि होरजोजी मंदिरे पाहिली. सर्व प्राचीन मंदिरे ७०० ते १४०० वर्षांपासूनची, पण अतिशय शांत, स्वच्छ अन् नीटनेटकी ठेवलेली. जवळजवळ सर्वच मंदिरे लाकडांपासूनच बनविलेली. जुन्या लाकडांच्या इमारती म्हणजे पेगोडाच आहेत. जिकोईन मंदिर थोडंसं उंचीवर असणारे बुद्धमंदिर आहे. इथला टी सेरेमोनी खूप प्रसिद्ध आहे. शिवाय इथे जाणाऱ्या सर्व पर्यटकांना तेथील जपानी मोंककडून प्रवचन आणि गोडासोबत माचो टी प्राशन करण्याची संधी मिळते. तिथल्या झाडांची फार सुंदर अन् मोहक पद्धतीने रचना केलेली आहे. शिवाय एक छानसं तळंही बाजूला आहे.

याकुशीजी मंदिर फार प्राचीन आणि मोठ्या क्षेत्रफळावर पसरलेलं होतं. एक शिंतो श्राइन होतं. तशोदाजी मंदिरसुद्धा इ.स. ७५० सालातील अतिशय प्राचीन मंदिर. सर्व ठिकाणची स्थापत्य कला बघण्यासारखी होती. सर्व मंदिरे पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवत होती की, जपानी लोक खूपच अगत्यशील आणि सहकार्य करणारे आहेत. फारच कमी बोलतात. आपल्यासारख्यांना खूप चुकल्यासारखं वाटतं. माणसांचा आवाजाच येत नाही. सायंकाळी पुन्हा जपानी शाकाहारी जेवणाची सोय करण्यात आली होती, जिथे भारतीय पद्धतीने खाली बसून जेवण केले. आतापर्यंत आम्ही जापनीज पद्धतीच्या शाकाहारी जेवणास परिचित झालो होतो. त्या रात्रीच्या जेवणानंतर पुन्हा डॉ. बेडेकर सरांची बौद्धिक मेजवानी. खाण्याने पोटात भर, तर बौद्धिक मेजवानीने ज्ञानात भर. त्यांच्याशी गप्पा म्हणजे मेंदूला जबरदस्त खुराकच असतो. विविध विषयांवर ते बोलू शकतात. हे सत्र रात्री १२ पर्यन्त चालले.

प्रत्येकच दिवस खूप खास होत होता, आज संपूर्ण

अनंत दुःखी क्षणांची भरपाई सुखाच्या एका क्षणाने होऊ शकते. - थॉमस कॅम्पबेल

मोकळा दिवस!! दुपारी ४ वाजेपर्यंत आपल्या मर्जीने शहर फिरायची मोकळीक होती. सगळे आपापल्या आवडीप्रमाणे निघाले, त्यातही एक गम्मत होती. अनोळखी देशात रस्ता न चुकता फिरायचे आणि न चुकता वेळेत परत यायचे. म्युझियम, डियर पार्क, बुद्धमंदिर अशा ठिकाणी सर्व जण गेले, काही जण नुसताच फेरफटका मारून आले. पण खरेदी मात्र सर्वांनी केली. कारण आमचं लॉज अगदी मध्यवर्ती भागात होते आणि जवळच एक शॉपिंगची गल्ली होती. काहींनी तर स्वस्त वस्तू मिळण्याची ठिकाणेपण शोधून काढली. ज्यांना जे हवे ते त्यांनी खाल्लं. आणि संध्याकाळी ५ वाजता आमची बस आली ओसाकाला जाण्यासाठी. प्रो. मियागवा आमच्याबरोबर होत्याच. रात्री आम्ही पोहोचलो. छान हॉटेल आणि छान लोकेशन होतं, नरीमन पॉइंट एरिया सारखं.

जपान मध्ये कुठेही मोठ्या बस छोट्या लेनमध्ये दिसल्या नाहीत, त्यामुळे आमची बस मुख्य रस्त्यावरच थांबली आणि तिथून पायी चालत आम्ही हॉटेल वर आलो. आज आम्ही एका नेपाळी रेस्टोरंट मध्ये भारतीय जेवण जेवलो.

इथल्या सर्व हॉटेल्समध्ये खूप छोट्या खोल्या असतात, पण त्यात सर्व सुखसोयी नीट बसवलेल्या असतात. जसा टीव्ही फ्रीज बाथ टब इत्यादी. पण पाणी मात्र इथे बेसिनच्या नळाचं प्यावं लागतं. पहिल्या दिवशी मनाची खूप तयारी करावी लागली. १/२ लिटर बाटली रु. १००/- होती आणि तेही खूपच थंड.. हॉटेलमध्ये ब्लॅक कॉफी हवी तेव्हढी प्यायला मुभा आहे.

पुढचा दिवस आहे ओसाका दर्शन. ही जपानची जुनी राजधानी. दळणवळण सोयीचे व्हावे म्हणून काही शे वर्षांपूर्वी मानवनिर्मित नदी बनवण्यात आली आहे, म्हणजे नदीचा प्रवाह वळवला आहे. आज तिथे बोटिंग ची सुविधा आहे. बोटिंगची मजा घेत राजवाडा बघायला आलो. दरवाजावर उभी असलेली व्यक्ती प्रत्येकाला वाकून अभिवादन करत होती. आमचा बस चालक सुद्धा प्रत्येक वेळी आम्हाला वाकून अभिवादन करायचा. खूप वेगळं वाटलं मला. कुठेही आरडाओरडा नाही. सगळं अगदी शिस्तबद्ध, ते पण कुणीही न सांगता. जपान मध्ये खूप वयस्कर माणसेही काम करताना दिसली. वॉचमन, टिकीट काऊंटरवर, स्वच्छता करणारे अगदी सगळी कामं ज्येष्ठ नागरिक हसऱ्या चेहऱ्याने करतात.

असो, तर आम्ही राजवाड्याच्या परिसरात पोहोचलो. सात मजली राजवाडा होता तो !! पण पर्यटकांना सोयीचा व्हावं म्हणून लिफ्ट लावली आहे, चालत जाण्यासाठी जिने आहेत. मी जिन्याने गेले आणि जपानी लोकांच्या सृजनशिलतेचा अजून एक नमुना दिसला. वर जाणारा जिना आणि खाली येणारा जिना यांची रचना अशी होती की, वर जाणारे व खाली येणारे कधीच एकमेकांना भेटणार नाहीत. फक्त आम्हाला दिसत होते पण आम्ही तिकडे जाऊ शकत नव्हतो. वर खाली जाण्या-येणाऱ्याची टक्कर नाही की बाजूचा जिना रिकामा दिसतो म्हणून कोणी उलटा जाऊ शकणार नाही. सातव्या मजल्यावरून संपूर्ण ओसाका शहर दिसत होतं अगदी चारही बाजूंनी. खाली उतरताना प्रत्येक मजल्यावर असलेलं प्रदर्शन म्हणजे तिथल्या राजाची गोष्ट, त्याची संपूर्ण कारकीर्द तिथे अतिशय रंजक पद्धतीने आणि आधुनिक माध्यमातून मांडलेली आहे.

दुपारी परत जपानी शाकाहारी जेवण. सूप, उकडलेल्या भाज्या, फारशा शिजलेल्या नाहीत की कच्च्या नाहीत, दोन तीन प्रकारचे भात आणि एक वड्यासारखा सोयाबीनचा पदार्थ. पोट खूप भरून गेलं.

त्यानंतर आम्ही राजवाड्याच्या आवारात आलो. म्युझियम बघायचे होते. खूप मोठ्ठं आहे हे, चार मजली.

---

वेग हे घोड्याचे भूषण आहे, तर डौलदार चाल हे हत्तीचे; चतुराई स्त्रियांचे भूषण आहे, तर सतत उद्योगात राहणे पुरुषाचे भूषण आहे.

अतिशय सुंदर, विस्तृत आणि अफाट माहितीपूर्ण. म्युझियम मधील बऱ्याच गोष्टी कळल्या. कारण प्रो. मियागावा आमच्याबरोबर होत्या. तिथले राजे-राजवाडेच नव्हे तर शहरं, वेगवेगळी उद्योगधंदे, गाड्या वगैरे. याबद्दल लिहिण्यासाठी वेगळा लेख लिहावा लागेल एवढं विलोभनीय म्युझियम.

त्यानंतर आम्हाला बसने खरेदीकरिता मार्केटजवळ सोडले. मग काय मज्जाच मज्जा ! आम्ही बाजाराच्या मध्यवर्ती भागात होतो. साओरी आणि युमी या विद्यर्थिनी सुद्धा सकाळपासून सोबत होत्याच. ही जागा खूप वेगळी होती. खूप वर्दळ, भरपूर दुकाने, खूप हॉटेल्स, दिव्यांचा झगमगाट, तरुणाईच्या भाषेत happening place. दोन तीन तास सर्वांनी फिरून मनसोक्त खरेदी केली कारण जागाच होती तशी, अगदी राम मारुती रोड सारखी. रस्त्याच्या पलीकडे जाण्यासाठी जमिनीखाली रस्ता आहे, तिथे अख्खं तीन मजली मॉल आहे. कपड्यांपासून इलेक्ट्रॉनिक पर्यन्त सर्वकाही आणि विविध ब्रँडसुद्धा. पण तिथेही जास्त गर्दी नव्हती. सगळं भुलभुलैय्या. मला तर काही कळलंच नाही कुठून आत गेलो आणि कसे बाहेर पडलो ते.

शॉपिंग संपेपर्यंत रात्रीचे आठ वाजले होते, टॅक्सी मिळत नव्हती, आम्ही चालत जायचे ठरवले. दोन मुलांचे जीपीएस चालू होते आणि त्यांनी आम्हाला सांगितले की फक्त २० मिनिटे चालायचे आहे, आम्ही चालायला सुरुवात केली, ५ मिनिटे झाल्यावर सुद्धा २० मिनिटे अजून लागणार होती !! असे करत ४०-४५ मिनिटे चालून WBF हॉटेल वर पोहोचलो. त्यानंतर काहीजण जेवण्यासाठी परत बाहेर पडले. पण ओसाकामध्ये एकही हॉटेल ९ नंतर चालू नव्हतं. जपान मध्ये रात्री फार लवकर निजानीज होते. रोजचं आम्ही रात्रीच्या जेवणासाठी ७-७.३० पर्यन्त बाहेर पडायचो आणि ९ पर्यन्त परत यायचो.

कधीही रस्त्यात उभे राहून गप्पा मारणारे, किंवा घरच्या खिडकीत अगदी बाल्कनीत सुद्धा लोक दिसले नाहीत. स्वच्छतेला खूपच महत्त्व आहे. ठिकठिकाणी कचरापेट्या आहेत, त्याही एका ठिकाणी चार प्लॅस्टिक, कागद, अन्न, इतर कचरा असे चार भाग. आपणही बरोबर तिथले नियम पळतो, कचरा डब्यातच टाकतो.

आज जपान वास्तव्याचा शेवटचा दिवस. आज ओसाका विद्यापीठाला भेट आहे. सकाळीच आम्ही निघालो, दोन तास बस प्रवास आहे. शहरापासून दूर आहे हे विद्यापीठ. जाताना शहर व्यवस्थापनाचा नमूना बघयला मिळाला. दुतर्फा डांबरी रस्ता आहे, दोन्ही बाजूंनी गाड्या जात आहेत-येत आहेत, आणि दुभाजकाच्या जागेवर दोन रेल्वे ट्रॅक आहेत. अविश्वसनीय !

विद्यापीठात आम्ही जरा लवकरच पोहोचलो, पण आमच्या स्वागतासाठी आधीच डॉक्टर शर्मा आणि डॉक्टर टोमिओ मिझोकामी उभेच होते. कॉलेज कॅम्पस मध्ये कुठेही इकडे तिकडे विद्यार्थी दिसले नाहीत. दुपारी पोहोचल्यामुळे अगोदर आम्ही जेवायला गेलो. कॉलेज कँटीन मध्ये जेवणाची सोय होती. शाकाहारी, मांसाहारी दोन्हीची सोय होती. आमच्यासाठी खास भारतीय करी मिळाली. इथे मात्र खूप चिवचिवाट होता. तरुणाईचं राज्य होते. बरं वाटले बोलण्याचा आवाज ऐकून; परंतु आवारात मात्र कुठेही विद्यार्थी आढळले नाहीत.

डॉ. मिझोकामी ह्यांनी दिल्ली विद्यापीठातून हिन्दी विषयामध्ये डॉक्टरेट (PHD) प्राप्त केलेली आहे, त्याशिवाय पंतप्रधान मोदींनी त्यांना पद्मश्रीही बहाल केलेली आहे. सध्या ते सेवानिवृत्त आहेत. त्यांनी अतिशय प्रभावीपणे हिन्दीतुन किमान दोन ते अडीच तास प्रेझेंटेशन केले. आश्चर्याचा भाग म्हणजे एकदाही त्यांनी जपानी किंवा इंग्रजी भाषेचा वापर बोलण्यात केला नाही. ज्यात प्रामुख्याने भारत-जपान या देशांचे पुरातन

ज्या ज्या वेळी अपयशाचा सामना करावा लागतो, त्यात्यावेळी डोके खाली करा आणि मुसंडी मारा.

काळापासून मैत्रीसंबंध कसे वाढत गेले, एकमेकांबद्दलचा आदर या गोष्टींचा समावेश होता. डॉ. शर्मा हे दिल्लीहून तिथे खास शिकविण्यासाठी गेलेले आहेत. विशेष म्हणजे त्यांना जपानी भाषा येत नाही त्यामुळे ते हिन्दी भाषांतर करून शिकवीत नाहीत. एक वेगळा आनंद इथे अनुभवायला मिळाला.

आणि अखेर परतीच्या प्रवासाची सुरुवात. प्रोफेसर मियागावा मॅडमचा निरोप घेतला. सावरी आणि युमी विमानतळावर आल्या होत्या. शेवटी त्यांचाही निरोप घेऊन आम्ही जपानमध्ये ८ दिवस घालवलेल्या क्षणांचा डोळे मिटून मनाशी आढावा घेत घेत परतीचा प्रवास सुरू केला. ओसका – सिंगापूर मार्गे पुन्हा मुंबई. माझ्या जीवनातील सर्वात सुंदर अशी अविस्मरणीय सहल ठरली ही जपान टूर !!!

**– विजया खरे**

---

(पृष्ठ क्र. १७ वरून - **दर्शन सूर्याच्या कंकणाचे**)

तो आम्हाला खूप आनंद देऊन गेला. एवढ्याचसाठी तर केला होता अट्टाहास.



**ग्रहणाचे सुटणे**

ग्रहण ही एक वाईट घटना आहे अशी अनेक लोकांची धारणा आहे. राहू आणि केतू सूर्याला गिळायला येतात म्हणून सूर्य झाकला जातो अशी अंधश्रद्धा अनेक समाजामध्ये रूढ आहे. त्यामुळे ग्रहणकाळात काही करू नये, काही करायचे असेल तर दानधर्म करावा असे सांगितले जाते. गरोदर स्त्रीने ग्रहण पाहू नये, पाहिले तर त्याचे दुष्परिणाम बाळाला भोगावे लागतात अशी श्रद्धा आहे. विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की ग्रहण हा सावल्यांचा खेळ आहे. सूर्य स्थिर असून पृथ्वी त्याच्या भोवती फिरते. त्याचबरोबर चंद्र पृथ्वी भोवती फिरतो. हे तीन जेव्हा एका रांगेत येतात तेव्हा सावली पडते. सूर्य आणि चंद्र यांच्यामध्ये पृथ्वी आली की तिची सावली चंद्रावर पडते. या स्थितीत 'चंद्र ग्रहण' होते. याउलट सूर्य आणि पृथ्वी यांच्यामध्ये चंद्र आला की 'सूर्य ग्रहण' होते. या घटनांची माहिती भारतीय खगोलशास्त्रज्ञांना फार पूर्वीपासून होती. पाचव्या शतकातील खगोलशास्त्रज्ञ आर्यभट्ट यांनी तर ग्रहणाचे वेळापत्रकच दिले होते. तरीही भारतीय समाजामध्ये ग्रहणासंबधी अनेक गैरसमज आहेत याचे आश्चर्य वाटते.

**– राजेंद्र कवठेकर**
पेंढारकर कॉलेज, डोंबिवली

**– सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण–शीळ रोड, काटई,
ता. कल्याण, जि. ठाणे – ४२१२०४

•••

दिशा
नियमित वाचा.
*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

---

यशस्वी होणं याचा अर्थ कधीही अपयश न मिळणं असा नसून, अंतिम ध्येय गाठणं असा आहे. – एडविन सी. ब्लिस

# भारतीय पुरातत्त्वविद्या आणि भाषाशास्त्र पार्श्वभूमी व युरोभारतीय आर्य पूर्वज - सिद्धान्त - प्रवाद

*श्रीमती अस्था पेरेल्ट्स्वेग व मार्टिन पा. लेव्हिस यांनी लिहिलेल्या 'The Indo-european Controversy : Facts and Fallacies in Historical Linguistics' या पुस्तकाचा परिचय या लेखात करून दिला आहे.- संपादक*

प्रास्ताविक : The Indo-european Controversy : Facts and Fallacies in Historical Linguistics.
लेखक द्वय : श्रीमती अस्था पेरेल्ट्स्वेग व मार्टिन पा. लेव्हिस, केंब्रिज युनि. प्रेस २०१५.

हे पुस्तक डॉ. विजय बेडेकरांनी परीक्षणार्थ अभ्यासासाठी दिले. तर या लेखकांचा या विषयाचा आणि तदनुषंगिक, पुरातत्त्व, भारतीय विद्या प्राच्य विद्या, युरो भारतीय इंडोइरेनिअन इ. विषयांचा केवढा सघन आणि विस्तृत अभ्यास असावा हे अनुक्रमणिकेवरून आणि काही पाने वाचल्यावर थक्क व्हावे असा एकंदर आवाका. त्यामुळे डेक्कन कॉलेजात नोकरी केल्यामुळे प्राच्य विद्योचे जे आयाम परिचित झाले त्या अनुषंगाने दिशाच्या वाचकांना पार्श्वभूमी समजून द्यावी असे वाटले म्हणून हा परिचय लेख प्रपंच.

डेक्कन कॉलेजातील भाषाशास्त्र व संस्कृतकोश यातील एक तज्ज्ञ डॉ. नीलमाधव सेन यांनी एका शब्दाचा प्रवास सांगितला, निघून सुरुवात करतो. तर लहानपणी ‘ऊन ऊन भाकरी आणि कढत कढत आमटी’ हे शब्द माहीत होते. ते दोन्ही संस्कृत उष्ण आणि क्वथत् या शब्दापासून आले आहेत. आयुर्वेदातील काढा हा संस्कृत क्वाथ या शब्दापासून झाला आहे. तर पुण्यामुंबईकडे मराठीत गरम शब्द हिंदीतून आला. पण त्याचे मूळ आहे वेदातील घर्म शब्दात. घर्म म्हणजे उष्ण. घर्मांशू म्हणजे ज्याचे किरण उष्ण आहेत तो सूर्य. तर हा म्हणजे परशांच्या अवेस्तात गेला. तिथून प्राचीन पर्शियन –तिथून अर्वाचीन फारसीमध्ये गेला. नंतर मोगलांनी भारतावर आक्रमण केले तेव्हा त्यांची जी सैन्याच्या तळावर बनलेली उर्दू बोलीभाषा Camplanguage तिथे रुळला. तिथून हिंदीत गेला आणि मग आताच्या मराठीत पोचला. पण वेदातून थेट आला नाही. संस्कृत घर्म शब्दाचे प्राकृतमध्ये घम्म झाले आणि मराठीत घाम शब्द आला. तो उष्णतेचा परिणाम आहे. वास्तविक संस्कृतमध्ये घामाला स्वेद शब्द आहे. त्याचे इंग्रजीत हे रूप आहे. मात्र हिंदीतला पसीना, गुजराती परसेवा ही प्रस्वेदची अपभ्रंश रूपे आहेत.

तसे एक उदाहरण आहे अरबी अंक Arabic numerals :123 इ. मोठमोठ्या भारतीय विद्वानांनी देखील या अंकाला पाश्चात्य विद्वानांचे अंधानुकरण करून तसेच म्हटले-अरेबिक न्यूमरल्स-अरबी अंक वास्तविक अरबानी १,२,३,४ हे अंक आपल्याकडून घेतले आणि त्यांना नाव दिले हिंदसा. हे झाले इ.स. ८ व्या शतकात. शून्याचा शोध तर आपल्याकडे प्राचीन काळी लागला आणि आपली गणन क्षमता पराधीपर्यंत पोचली. गंमत म्हणजे त्या शून्याला आपण पूज्य बनवले. तर युरोपियनांनी ते अंक अरबांकडून घेतले आणि त्यांना अरेबिक अंक म्हटले. पण आपल्या विद्वानांनी तसे म्हणणे शुद्ध अंधानुकरण आहे. शासनाला खूष करण्यासाठी तसे पाश्चात्य प्राच्य विद्या पंडित पण करतात. पुरातत्त्वज्ञानात मोहेंजोदडो हडप्पा या उत्खननात सिंधु संस्कृतीचा शोध लागला. त्यात मॉर्टिमोर व्हीलर यांचा मोठा वाटा होता. कोल्हापूरजवळ ब्रह्मगिरीचे उत्खनन त्यांनी केले. तर मॉर्टिमोर व्हीलरनी पाकिस्तान झाल्यावर तिथल्या वायव्य सरहद्द प्रांतात चालू ठेवले. खान अब्दुल गफारखान हे पाकिस्तानच्या तावडीत

अडकले-त्यांना आपण 'सरहद्द गांधी' हा किताब दिला होता आणि त्यांनी ४० वर्षांपूर्वी भारताला भेट दिली तेव्हा त्यांचा सत्कार करून ३५ लाखांची थैली दिली. त्यांना काही पठाणांचे पख्तुनिस्तान मिळाले नाही. तर या मार्टिमोरव्हीलरनी सरहद्द प्रांतातील संशोधन पूर्ण करून पुस्तक लिहिले 'Five thousand years of Pakisthan : पाकिस्तानचा ५००० वर्षांचा इतिहास!!'

पुरातत्त्व विघा आणि तौलनिक भाषाशास्त्र ही आपल्याला इंग्रज संशोधकांकडून मिळालेली देणगी आहे. क्रामरिश नावाचा पुरातत्त्व संशोधन वायव्य सरहद्दीवरील शोध मोहिमेत वाघाला बळी पडला असे म्हणतात. त्याच्या पत्नी स्टेल्ला क्रामरिश यांनी १९४६ साली Hindu Temple २ वर प्रमाणभूत ग्रंथ लिहिले. पाणिनी तर वायव्य भारताला शालातुरीय इथे इ. स. पूर्व ५/६ व्या शतकांत होऊन गेला. व्याघ्र या शब्दाची व्युत्पत्ति व्याजिघ्रति इति म्हणजे 'जबडा वासून हुंगत येतो तो' हे त्रिकालाबाधित सत्य आहे. पण ते निरीक्षण त्याने प्रत्यक्ष वाघ समोरून जबडापासून हुंगत हुंगत येताना केले आणि भूर्जपत्रावर लिहिले अशी आख्यायिका आहे. अष्टाध्यायी या व्याकरण ग्रंथाची ती शेवटची नोंद असावी. कारण त्या वाघाने त्यांच्यावर झडप घालून त्याला खाऊन टाकले.

याच पाणिनीवर विसाव्या शतकात अखेरीस डॉ. सुमंत मंगेश कत्रे यांनी Dictionary of Panini चे तीन खंड लिहून प्रसिद्ध केले. त्या ग्रंथाची संस्कृत अर्पणपत्रिका गुरू आणि गुरू पत्नी यांना केलेली अशी-

(व्याकरण) शास्त्रस्थ पितरौ वन्दे डोरोथी-राल्फ-टर्न रौ।।

त्यांच्याच व्याकरण गुरूनीं आचार्या आणि आचार्यानी या दोन शब्दातीत व्याकरण दृष्ट्या फरक नोंदविलेला आहे. आचार्या म्हणजे प्रत्यक्ष विद्या शिकवणाऱ्या स्त्रीशिक्षिका व आचार्यांनी म्हणजे आचार्य पत्नी. ही परंपरा हिंदीत नोकर-नोकरानी इथपर्यंत सलग चालू आहे, पाणिनीपासून म्हणजे अडीच हजार वर्षे.

डॉ. कत्रे यांनी पाणिनीवरील कोश अमेरिकेतील एका विद्यापीठात अतिथी प्राध्यापक या भूमिकेत लिहिला. एकोणिसाव्या शतकात युरोपीय तौलनिक भाषाशास्त्रज्ञांना प्रथम लॅटिन व संस्कृत मधील साम्य आढळले आणि तिथून युरोभारतीय-शर्मण्य-भारतीय, पारसिक-भारतीय इ. भाषाशास्त्राच्या शाखा निर्माण झाल्या. नाते विषयक शब्द पितृ मातृ भातृ-स्वसृ-Vater-Mutter, Frater, Shweshter, Pere, Mere, Aherer,- Father, Mother, Brother, Sister इ. संस्कृत जर्मन फ्रेंच, इंग्रजी हे सर्व त्यांचे मूळ आर्य पूर्वज एकत्र राहात होते हा सिद्धान्त पुढे आला. त्यातून ते कॉकेशस पर्वतात राहत होते. वैदिक-पूर्व भाषा बोलत होते इ. तर्क पुढे आले आणि त्यांचे खंडन मंडन वरील २०१५ च्या पुस्तकापर्यंत चालू आहे. भारतात तौलनिक भाषाशास्त्र आणि पुरातत्त्व विद्या या दोन विद्या शाखा डॉ. सुमंत मंगेश कत्रे व डॉ. हसमुख धीरजलाल सांकलिया यानी इंग्लंडमधून भारतात आणल्या आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी सर्व देशभरच्या विद्यापीठात स्वतंत्र विभाग निर्माण करून रुजवल्या. डेक्कन कॉलेजमध्ये भाषाशास्त्रशाखेचा विस्तार म्हणून संस्कृत इंग्रजी ज्ञानकोशात्मक महाकोशाची पायाभरणी डॉ. कत्रे यानी १९४८ साली, फ्रेंच प्राच्य विद्या विशारद डॉ. लुई रनु यांच्याशी पत्रव्यवहार करून केली. पुढे त्यांनी १,२००/- संस्कृत ग्रंथ वेदापासून १८ व्या शतकातील ग्रंथातील निवडक ग्रंथ घेऊन त्यातील शब्दांच्या छापील स्लिषा बनवून एक पत्रिकागार - Scriptorium तयार केले. त्यात त्या स्लिपा अकारादिहामाने लावल्या आहेत आणि वरपासून खाली खाली पोलादी कपाटातील कप्प्यात त्या रचल्या आहेत. त्यांची संख्या ८५,०००/- आहे. त्यातील थोड्या थोड्या स्लिपा घेऊन त्यानुसार संपादक मंडळ कोशाच्या एकेका खंडासाठी मजकूर चतकोर कागदावर लिहून तयार करतात. प्रधान संपादक,

एखादा माणूस शूर, हिंमतवान ठरतो तो इतरांपेक्षा अधिक धैर्यवान असतो म्हणून नाही; तर इतरांपेक्षा धैर्य दहा-वीस मिनिटे जास्त टिकवतो म्हणून. - राल्फ वाल्डो इमर्सन

साहाय्यक संपादक, उपसंपादक व संशोधन साहाय्यक अशी श्रेणी आहे. तर यांनी १९७६ ते २०१९ पर्यंत ३० व्या वर खंड काढले आहेत. प्रत्येक खंड सुमारे २०० पृष्ठे. तरीपण इतक्या वर्षात 'अ' ने सुरू होणारे शब्द संपले नाहीत.

डॉ. सांकलियानीं पुरातत्त्व विभाग भारतात आणला आणि त्यांचेही विद्यार्थी देशभर गेले आणि वेगवेगळ्या विद्यापीठात त्यांनी पुरातत्त्व विभाग सुरू केले. डॉ. सांकवियानी पुरातत्त्व परिचय नावाची पुस्तिका गुजराती व मराठीत छापून लोकांपर्यंत पुरातत्त्वविद्या पोचवली. त्यांच्या एका विद्यार्थ्यांनी डॉ. वि. श्री. ऊर्फ हरिभाऊ वाकणकर यांनी भीमबेटका या गुंफेचा शोध लावून आदिवासींची गुंफाचित्रे शोधली. ती गुहांमधील भिंतीवर अणुकुचीदार दगडानी रेखाटली आहेत. त्यांचा कालखंड इ.स. पूर्व २८,००० एवढा आहे. त्यानंतर त्यांनी ३. शास्त्रज्ञांचे पथ हिमालयापासून भुजपर्यंत नेले. त्यासाठी त्यांनी पश्चिमवाहिनी लुपतसरस्वतीचा शोध उपग्रहाद्वारे मिळवला. त्या लुप्त सरस्वतींबद्दल महाभारतात व्यासानीं पृथूदक नावाच्या हरियाणातील क्षेत्रापासून पश्चिमवाहिनी सरस्वती अदर्शना आणि अंतःसलिला झाली असे म्हटले आहे. तर या शास्त्रज्ञांनी ४० वर्षापूर्वीच्या राजसथान सरकारला त्या नकाशातील रेषोवर कूपनलिका खोदायला सांगितले आणि त्यांना खोलवर गोडे पाणी मिळाले. अलीकडे भुजला भूकंप झाल्यावर समुद्रातून गोड पाण्याचे कारंजे उसळले. साकलियांचे छात्र डेक्कन कॉलेजचे निवृत्त सहसंचालक डॉ. राजगुरु यांनी ते पाणी लुप्त सरस्वतीचे आहे असे जाहीर केले.

त्यानंरचा किस्सा समुद्रात बुडालेल्या द्वारकेच्या शोधाचा. महाभारताचे मुद्रण संपल्यावर भांडारकर प्राच्य विद्या संस्थेचे हरिवंश या खिलपर्वाचे संपादन डॉ. अ. दा. पुस्मळकर करीत होते. त्यांना तीन ठिकाणी समुद्राने द्वारका नगरी गिळंकृत केली असे श्लोक सापडले. त्यांनी डॉ. सांकलियाना फोन केला. डॉ. सांकलिया हे मूळचे मुंबई विद्यापीठाचे शालावेदान्त पारितोषिक विजेते आणि गुजराती. त्यामुळे त्यांनी तो संदर्भ मिळवला आणि त्यातले उत्खनन potential जाणले. ते थेट ४० वर्षांपूर्वीच्या गुजरात सरकारकडे जाऊन धडकले. त्यांनी द्वारकाधीशाच्या शेजारी सरकारी जमिनीतला एक भूखंड मिळवला. गुजराती बाणा म्हणजे त्यांची आणखी एक आठवण. आम्ही गावातून डेक्कन कॉलेजला मूळ लोकलने जात असू. ते एकदा म्हणाले, तुमच्या भाड्याच्या पैशात आम्ही एव्हाना बस हप्त्यावर खरेदी केली असती. तर त्यांनी प्लॉट पटकन मिळवून तिथे Vertical excavation म्हणजे उभे उत्खनन केले आणि अरिवंशातल्या श्लोकाला प्रत्यक्षात उतरवले. तिथे त्यांनी श्री. म. माट्यांचे चिरंजीव म. श्री. माटे यांना पाठवले आणि तिथे म्युझियम उभारले. त्यात उत्खननातले पुरावे ठेवले आहेत. आणि माट्यांकडून उत्खननाचा अहवाल तयार करून छापला. ह्या सगळ्याचा संशोधन लाभ म्हणजे तो अहवाल वाचल्यापासून द्वारकाधीशाच्या मंदिराशेजारी जसे तीन सांस्कृतिक थ सापडले तसे आपच्या लिंबच्या लक्ष्मी नारायण मंदिरासमोर एक कुंभाराच्या वसतीचे टेकाड आहे ज्याला आपटे गढी असे नाव आहे, तिथे असेच तीन थर ढासळलेल्या दर्शनी भागात मला जाणवत असत. डेक्कन कॉलेजच्या पुरातत्त्व विभागात डॉ. सांकलियांच्या हाताखाली काम करताना मी डॉ. माट्यांच्या खोलीत बसत असे. त्यामुळे तितपत उत्खनन क्षमता मला जाणवत असे. पण तिथे प्रत्यक्ष उत्खनन व्हायला २०१७ साला उजाडले. डॉ. वसंत शिंदे हे कुलगुरू असताना त्यांनी प्रत्यक्ष पहाणी करून उत्खनन घडवले. मला जेव्हा उत्खनन क्षमता जाणवू लागली. त्यावेळी मी डॉ. श्रीनिवास सुपेकर ज्यांनी नर्मदाखोऱ्यात पुरातत्त्व परीक्षण केले त्यांना नेऊन दाखवले आणि तिथे उत्खनन सफल होईल असा होरा वर्तवला होता. पण तेव्हा काहीच झाले नाही. या सर्व सफल

उत्खननाचे श्रेय श्रीमती अनिता आगाशेना आहे. त्यांचे सचित्र व्याख्यान बेडेकर कॉलेजात झाले आहे.

पुरातत्त्व ही जगभर पसरलेली ज्ञानशाखा आहे. युरोपात प्रथम Pompey इथे पाश्चात्य पुरातत्त्व संशोधकाना सोमन शहर भूमिगत असल्याचा भास झाला आणि उत्खननात ते सापडले. तशीच प्राचीन प्रगत नगरे सिंधुनदीच्या खोऱ्यात पाश्चात्यांना सापडली.

सांकलियांचे एक विद्यार्थी पद्मश्री हरिभाऊ वाकणकर यानी उपग्रह चित्रांच्या आधारे लुप्त आणि भूमिगत पश्चिम वाहिनी सरस्वतीच्या पात्राचा शोध लावून राजस्थानातल्या वाळवंटात ठिकठिकाणी कूपनलिकेतून गोडपाणी मिळवले. तर सांकलियांचे दुसरे विद्यार्थी बंगलोरचे एस. आर. राव यांनी समुद्रात खोल बुडालेली द्वारका शोधण्यासाठी गोव्याच्या मरिनॉलाजी या शोध संस्थेत Marine Archaeology हा विभाग नव्याने स्थापून त्याच्या मार्फत पाणबुड्यांच्या साहाय्याने मैलभर खोल समुद्र तळ्यातील निद्रिस्त द्वारकेतील वस्तू वर आणल्या आणि त्याचे संग्रहालय बनवले. तमिळनाडूतील पूर्व समुद्रात अशीच एक पुम्पुहार नावाची नगरी पूर्व समुद्रात निद्रिस्त आहे असे म्हणतात. डॉ. गणपती स्थपतींच्या अनुमानाप्रमाणे कन्याकुमारीच्या दक्षिणेस कुमरी नावाचे बेट होते आणि तिथे विश्वकर्मा स्थपतींची वस्ती होती पुढील संशोधनासाठी. ओघाने आले म्हणून उल्लेख करतो. मॅक्सम्युलरने आपल्या पत्नीला लिहिलेल्या पत्राबद्दल भारतीयांच्या मनात सल आहे. पण असे म्हणतात की टिळकांना मंडालेला पाठवल्यावर त्याने इंग्रज सरकारला पत्र लिहिले. त्या मुक्तात्म्याला शरीररूपातच तुम्ही कैद करू शकता. मॅक्समुल्लरचे वडील Wilhem Muller हे ख्रिश्चन मिशनरी होते आणि मुलाला पण ते मिशनरी बनवणार होते. पण संस्कृतच्या प्रेमापोटी तो पळून पॅरिसला गेला आणि मग इंग्लंडला जाऊन त्यानी संस्कृत प्रकाशने Sacred books of the East म्हणून काढली. त्याच विद्वानांची आणखी एक वदंता आहे की, एडिसनने फोनोग्रामचा शोध लावला. आणि पहिले धवनिमुद्रण करण्यासाठी मॅक्समुलरना बोलावले. त्यावेळी त्यांनी ऋग्वेदाची पहिली ऋचा म्हणजे मानवाचा पहिला उच्चार 'अग्निमीळे पुरोहितम्। यज्ञस्य रत्नधातमर्म।' ही ऋचा ध्वनिमुद्रित केली. त्याच वेळी म्हणजे एकोणिसाव्या शतकाव्या उत्तरार्धात थिबो नावाच्या पंडिताने इंग्रजी २६ अक्षरातील F, Q, W, X, a, z ही पाच अक्षरे वगळून २१ अक्षरावर ४९ संस्कृत मुळाक्षरे बसवली. त्यासाठी त्यानी डायक्रिटकल खुणा तयार केल्या. उदा. त वर्गासाठी TTh आणि ट वर्गासाठी TTh इ. त्यामुळे संस्कृत साहित्याचा प्रसार जगभर झाला. यानिमित्ताने संस्कृतसाठी केवढी मेहनत या पाश्चात्य विद्वानांनी केली. विल्य जोन्स जेव्हा बंगाली पंडितांकडे शिकायला जाई त्यावेळी त्याच्याकडे ग्रंथ तो पंडित दुरून सरकवत असे. म्हणजे एक प्रकारची अस्पृश्यता. १८३६ च्या सुमाराला Böthlink a Roth या दोघांनी संस्कृत जर्मन हा सप्त खण्डांत्मक शब्दकोश सुरू केला. तो Saint Petersberg मध्ये. आता त्या स्थानाचे लेनिन ग्राड होऊन पुन्हा पीटर्स बर्ग झाले. तर तेव्हा तेथे रशियन बादशहा झार यांचे अधिपत्य होते. संस्कृत कोशाला मदत मागताना त्यानी असा युक्तिवाद केला. 'आम्ही हा कोश करू. मग ख्रिश्चन धर्माचे साहित्य संस्कृतमध्ये लिहू. मग त्याचा भारतात प्रचार करू. म्हणजे ते लोक ख्रिश्चन होतील. ते कितपत झाले ते इतिहासच जाणे. पण त्या कोशाच्या आधारे Monier William नी संस्कृत-इंग्रजी कोश १८५०-६० मध्ये लिहिला. त्याच्या प्रस्तावनेत त्यांना त्यासाठी मिशनरी शिष्यवृत्ति मिळाल्याचा उल्लेख आहे. त्याच्या आधारे डेक्कन कॉलेजमध्ये टिळक आगरकर वामन शिवराम आपटे १८७३-७७ मध्ये शिकले. पुढे न्यू इंग्लिश स्कूल व फर्गसन कॉलेजची स्थापन १८८० व १८८५ मध्ये झाली. त्यावेळी १८८५ व १८९० मध्ये प्रा.

आपट्यानी Students edition आणि Pradicle Science D.C. व English-Sanskrit असे ३ कोश तयार केले. त्यांच्यावर १९९३ मध्ये एक चर्चासत्र आयोजित केले. त्यावेळी एक दुर्लक्षित विद्वान असे वर्णन केले. त्यावेही प्रा. म. अ. मेहेंदळे यांनी जगातील निदान ५० विद्यापीठात संस्कृत विद्यार्थ्यांच्या टेबलावर आपटे डिक्शनरीच असते असा उल्लेख केला.

जर्मनीत बॉन येथे २०० वर्षापूर्वी संस्कृत विभाग सुरु झाला तर पोलंडमध्ये १८९३ मध्ये. अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठाच्या Harward Sanskrit Series ला १५० हून अधिक वर्षे झाली आहेत. युरोपातील विधुआनिया हा एक मुंबई एवढा छोटा देश आहे. तिथला एक संशोधक Dr. Waldas Yaskunas यांचे व्याख्यान बाजीराव सभागृहात झाले होते. त्यावेळी त्यांना एक प्रश्न विचारला होता. 'मुकची लिथुआनियन भाषा रशियनला, जर्मनलाकापोलिशका जवळ आहे. तेव्हा त्याने उत्तर दिले 'संस्कृतला'. यावर तरुणानी संशोधन करायला हवे.

या सर्वांवरून एक गोष्ट स्पष्ट होते Indo- European लोकांचा कदाचित एक आर्यवंश असावा व त्याची भाषा संस्कृत पूर्व असावी. हा सिद्धान्त मान्य नसणारे काही चिंतक भारतात आहेत. त्याचे कारण इंग्रजांनी आम्ही भारतावर आक्रमण करणारे पहिले नाही असा प्रचार केला. आधी आर्य आले. त्यांनी सिंधु खोऱ्यातील निवासींची कत्तल केली. त्यासाठी त्यांनी तिथल्या उत्खननातल्या सांगाड्यांचा अर्थ लावला. आता तो निष्कर्ष खोटा ठरला. तसेच गोरखपूरच्या Dr. Shivaji Shingh यांनी आर्यलेन आगमन नव्हे तर निर्गमन अशी मांडणी करणारी पुस्तिका लिहिली. डॉ. शां. भा. देवांनी शालेय पाठ्यपुस्तकांतील आर्य भारतात बाहेरून आले हा उल्लेख पुरातत्त्वाच्या आधारे दुरुस्त करायला हवा असे म्हटले आहे.

एकंदरीत तौलनिक भाषाशास्त्र आणि तौलनिक वंशशास्त्र हे दोन एकमेकांशी जुळणारे विषय आहेत. त्याचा अधिक चिकाटीने अभ्यास व्हायला हवा. हे या २०१५ च्या पुस्तकाचे स्वागत करताना म्हणणे उचित होईल.

**– डॉ. प्रभाकर आपटे**
सी–५, ४०१, बुद्धदेव विहार,
हिलगार्डन, ठाणे (प) – ४०० ६१०.
दूरभाषा : ७०२१७७६५१५

•••

---

(पृष्ठ क्र. २२ वरून -**सावरकरांचा माफीनामा : समज आणि वास्तव**)

बेड्या, हातकड्या, कोठडीबंद्या, अन्नत्याग इत्यादी सर्व 'द ऑन' शिक्षा सावरकरांनी भोगल्याच होत्या. नातेवाईकांना सोडाच पण सख्ख्या भावालाही इंग्रजांनी भेटू दिले नाही. ते इंग्रज सरकार काय ह्या माफीनामे आणि निवेदनांनी बधणार होते काय? अजिबात नाही!

शेवटी माझं एकच सांगणं आहे. सध्या 'सुमारांची सद्दी' आहे. त्याला बळी पडू नका. त्यांच्या फाजील आत्मविश्वासाकडे दुर्लक्ष करा. येनकेन प्रकारेण ते प्रकाशझोतात राहू इच्छितात. त्यासाठी ते विचारवंतांचा आव आणतात आणि कसलेही संदर्भ नसलेली किंवा इतिहासाशी संबंध नसलेली विधानं करतात. ह्यापासून सांभाळून रहा. माझ्याकडून जितकं होईल तितकं मी करेनच. जिथे गरज असेल तिथे संदर्भ किंवा पुरावे देईनच. पण तुम्हीही तितक्याच नीरक्षीरविवेकबुद्धीने वागा. एखादी खोटी गोष्ट शंभर वेळा सांगितल्याने खरी ठरतं नसते हे पक्कं लक्षात असू द्या.

**– संकेत कुलकर्णी**
लंडन

•••

---

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

पूर्व प्राथमिक विभागाच्या दुसऱ्या सत्राची सुरुवात १४ नोव्हेंबर रोजी झाली.

• १४ नोव्हेंबर – १४ नोव्हेंबर पं. जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस बालदिन म्हणून साजरा करण्यात येतो. सामूहिक प्रार्थनेनंतर मुलांना पं. जवाहरलाल नेहरूंबद्दल तसेच आपण हा दिवस बालदिन म्हणून का साजरा करतो याची थोडक्यात माहिती सांगितली.

• १५ नोव्हेंबर – १५ नोव्हेंबर रोजी वेशभूषा दिवस साजरा करण्यात आला. नर्सरी व ज्युनिअर के जी करिता मुलांच्या दृष्टीकोनातून सुसह्य वेशभूषा (Comfortable costumes) आणि सिनियर के. जी. करिता विविध उत्पादनांच्या जाहिराती सादर करणे असे विषय दिले गेले होते.

नर्सरी व ज्युनिअर के. जी. मधील मुलं स्वातंत्र्यसैनिक, नेते, शेतकरी, सामाजिक मदतनीस, सामाजिक उपदेश देणारे फलक (उदा. झाडे वाचवा, प्लास्टिकचा वापर टाळा, इ.) बनून आले होते.

सिनिअर के. जी. च्या मुलांनी विविध उत्पादनांच्या तसेच सामाजिक उपदेश देणाऱ्या (उदा. मुली जगवा) जाहिराती सादर केल्या.

मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद वेशभूषा दिवसाला मिळाला.

• वार्षिक स्नेहसंमेलन–दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यालंकार सभागृहात १९ डिसेंबर– माध्यमिक विभाग, २० डिसेंबर–प्राथमिक विभाग आणि २१ डिसेंबर–पूर्व प्राथमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले.

पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ. अपर्णा वरुडकर यांनी वर्षभरात घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा अहवाल सादर केला. यानंतर पूर्व प्राथमिक विभागातील मुलांनी मनोरंजन पर कार्यक्रम सादर केले. वयाने लहान असले तरीही कार्यक्रम सादर करताना ह्या बाल कलाकारांचा आत्मविश्वास वाखाणण्याजोगा होता. सर्व लहान कलाकारांना जमलेल्या प्रेक्षकांकडून टाळ्यांद्वारे वाहवा मिळत होती. २०१९ –२० चे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले.

• २३ डिसेंबर – २३ डिसेंबर रोजी ख्रिसमसचा सण साजरा करण्यात आला. वर्ग तसेच व्हरांडा चांदण्या, तोरण, मुलांनी रंगविलेली ख्रिसमस ट्री, विविध चित्रे ह्यांनी सजविण्यात आले होते. वर्गात ख्रिसमस ट्री तसेच येशू ख्रिस्ताच्या जन्माची प्रतिकृती ठेवण्यात आली होती. सामूहिक प्रार्थनेनंतर मुलांना येशू ख्रिस्ताच्या जन्माबद्दल तसेच ख्रिसमसबद्दल थोडक्यात माहिती सांगण्यात आली. आमच्या लहानग्यांनी सांताक्लॉज बरोबर नृत्य केले व सांताने सर्वांना केकचा गोड खाऊ दिला.

• २४ डिसेंबर – २४ डिसेंबर रोजी शाळेच्या आवारात आनंद बाजार भरविण्यात आला होता. पूर्व प्राथमिक विभागातील मुलांनी स्वत: तयार केलेली ब्रेसलेटस्, भेट पाकिटे, पंखे, चेंडू इ. विक्रीसाठी ठेवण्यात आली होती. सिनीयर के. जी. चे काही विद्यार्थी दुकानदार झाले होते व इतर सर्व विद्यार्थ्यांनी पालकांबरोबर आनंद बाजाराची मजा लुटली.

• दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षीही संस्कृती कलादर्पण तर्फे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये सिनिअर के. जी. च्या मुलांनी सिंड्रेला नाटक आणि ओणम नृत्य

सादर केले. सिंड्रेला नाटकाने पुढील पारितोषिके पटकाविली.

- सर्वात्कृष्ट नाटक – सिंड्रेला
- सर्वात्कृष्ट नायिका – कु. मिहिका काळे
- सर्वात्कृष्ट संचलन – कु. कुशाग्र परांजपे
- सर्वात्कृष्ट दिग्दर्शन – सौ. योगिता नाईक (शिक्षिका)

सलग ७ व्या वर्षी आमच्या शाळेला बक्षिसे मिळाली आहेत.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**संस्कृती कलादर्पण संस्थेतर्फे आयोजित आंतरशालेय विविध स्पर्धांचे निकाल :**

**१) निबंध स्पर्धा :**

५ वी / ६ वी : प्रथम – आर्या राऊत

७ वी / ८ वी : प्रथम – सौम्या मराठे

९ वी / १० वी : प्रथम – नंदिनी माने

**२) हस्ताक्षर स्पर्धा :**

५ वी / ६ वी : प्रथम – स्वानंदी पाटणेकर

७ वी / ८ वी : प्रथम – वेदिका मानकामे

**३) चित्रकला स्पर्धा :**

५ वी / ६ वी : प्रथम – मेधावी सावंत

७ वी / ८ वी : प्रथम – अस्मी वारीक

९ वी / १० वी : द्वितीय – नंदिनी माने

**४) भेटकार्ड स्पर्धा :**

५ वी / ६ वी :प्रथम – अथर्व लोटलीकर

७ वी / ८ वी :प्रथम – स्वरदा मोरे

**युनिफाईड आंतरराष्ट्रीय इंग्लिश ऑलिंपियाडचा निकाल :**

राष्ट्रीय स्तरावर क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्याचे नावे खालील प्रमाणे :

| इयत्ता | विद्यार्थ्यांची नावे | क्रमांक |
|---|---|---|
| ९ वी | मृण्मयी गांगल | ३४ वा |
| ७ वी | यश स्वार | ३७ वा |
| ७ वी | देविका भट | ७९ वा |

**आय. पी. एम. मेगा फायनल (२०१९)**

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| पाचवी | निहाल ठोसर | १५९ |
| आठवी | ईशान फणसे | १३९ |

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**मराठी आणि तिच्या बोली**



दि. २१ जानेवारी २०२० रोजी महाविद्यालयाच्या जन संज्ञापन व पत्रकारिता विभागातर्फे 'मराठी आणि तिच्या बोली' हा कार्यक्रम मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आला होता. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी ''लेकीच्या माहेरले माय सासरी नांदते'',''मन वढाय वढाय'' या

स्वतःच्या वृत्तींचा नीट सूक्ष्म अभ्यास करा. तुमच्या असे लक्षात येईल की, तुम्हांला बसलेला प्रत्येक तडाखा तुम्हीच तुमच्यासाठी तयार केलेला आहे. – स्वामी विवेकानंद

बहिणाबाई यांच्या कविता सादर करत कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ज्येष्ठ अभ्यासिका अंजली गांगल या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. यावेळी 'मराठी भाषेतील म्हणी' या विषयावर अंजली गांगल यांचे व्याख्यान झाले. महाविद्यालयातील अनेक प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी मराठीतील बोली भाषांमधील कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. महेश पाटील व डॉ. विमुक्ता राजे यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### कमी उपस्थिती संदर्भात विद्यापीठ तक्रार निवारण समिती

कमी उपस्थिती संदर्भात विद्यापीठ तक्रार निवारण समितीची बैठक दिनांक ५ डिसेंबर २०१९ रोजी पार पडली. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांना सदर समितीचे सदस्य म्हणून बैठकीकरिता आमंत्रित केले होते.

### आचार्य महाविद्यालय, मुंबईचा अर्थमंथन उत्सव



आचार्य महाविद्यालय, मुंबई यांच्याद्वारे आयोजित केलेल्या अर्थमंथन या उत्सवामधील वादविवाद स्पर्धेत आमच्या महाविद्यालयातील प्रथम विधी वर्षातील कु. सोनिया मिश्रा हिने प्रथम क्रमांक पटकावला.

### इंटरनल क्वालिटी ऑशुरन्स सेल

दिनांक १३ डिसेंबर २०१९ रोजी महाविद्यालयातील कॉन्फरन्स रुममध्ये इंटरनल क्वालिटी ऑशुरन्स सेलची बैठक पार पडली.

### ॲड. प्रभाकर हेगडे व्याख्यानमाला




विधी फाऊंडेशनच्या सहाय्याने दिनांक १५ डिसेंबर २०१९ रोजी महाविद्यालयातील मनु सभागृहात ॲड. प्रभाकर हेगडे व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. वरिष्ठ वकिल डॉ. शेट्टी ह्यांनी वैद्यकीय निष्काळजीपणा ह्या विषयावर व्याख्यान दिले. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी, आनंद विश्वगुरुकुल विधी महाविद्यालयातील विद्यार्थी आणि ठाण्यातील काही वकिलांनी सहभाग नोंदविला. आमच्या महाविद्यालयातील जून, २०१९ या तृतीय वर्ष विधीमधील उत्तीर्ण विद्यार्थी ॲड. अंकित डिंडाळे ह्यास उत्कृष्ट तरुण वकील हा पुरस्कार देण्यात आला.

माननीय जिल्हा न्यायाधीश श्री. वैभव यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्घाटन झाले. महाराष्ट्र आणि गोवा बार काउन्सिलचे सदस्य ज्येष्ठ वकील गजानन चव्हाण विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. ठाणे वकील संघटनेचे अध्यक्ष श्री. प्रशांत कदम हे आमच्या कार्यक्रमासाठी आदरणीय अतिथी म्हणून लाभले. ज्येष्ठ वकील श्री. प्रमोद पाटिल आणि श्री. एस. पाटील यांना जीवन गौरव पुरस्कार देण्यात आला.

दुःखाचा डोंगर चढल्याशिवाय सुखाचे शिखर सापडत नाही.







### सत्र एकच्या अंतर्गत आणि प्रात्यक्षिक परीक्षा

विद्यापीठाद्वारे शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून प्रथम वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांसाठी ४० गुण अंतर्गत परीक्षा व ६० गुणांची सत्र परीक्षा ठेवण्यात आली आहे. प्रथम वर्ष विधीची प्रवेश प्रक्रिया ३० नोव्हेंबर, २०१९ पर्यंत चालू होती. त्यानंतर विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक प्रशिक्षण परीक्षा दिनांक २१, २३, २४ व २६ डिसेंबर, २०१९ ला घेण्यात आली.

### विद्यापीठ सत्र परीक्षा

एल. एल. बी. सत्र ३ व सत्र ५ च्या परीक्षा ह्या दिनांक ११ डिसेंबर ते २० डिसेंबर २०१९ रोजी पार पडल्या.

### मराठी विशेष व्याख्यान

प्रथम वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांसाठी मराठी विशेष व्याख्यान आयोजित केले होते.

| दिनांक | वेळ | विषय | प्राध्यापक |
|---|---|---|---|
| २८/१२/१९ | ५.००-८.०० | करार कायदा | ॲड. अंबर जोशी |
| ३१/१२/१९ | ५.००-८.०० | कामगार कायदा | ॲड. अरुण गायकवाड |

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

### डिसेंबर २०१९ मधील कार्यक्रम / वार्ता

२ डिसेंबर : डॉ. नीतिन जोशी आणि डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी प्राध्यापक विकास कार्यक्रमासाठी महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाला भेट दिली.

५ डिसेंबर: प्रा. कुणाल के. पुंजानी, प्रा. दीप्ती पेरिवाल आणि अमित नंबियार यांनी ब्रीम्समध्ये यूथ इनोव्हेशन चॅलेंज २०१९ चे यशस्वीरित्या आयोजन केले. या कार्यक्रमात आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा घेण्यात आली. मुंबईतील विविध महाविद्यालयातील २० संघ आणि ६० स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. डॉ. मीनाक्षी यांनी युवा इनोव्हेशन चॅलेंज २०१९ मध्ये मॉक स्टॉक स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडली.



७ डिसेंबर : डॉ. स्मिता जपे आणि श्रीमती श्वेता नायर यांनी 'मर्मबंध-माजी विद्यार्थी संमेलन २०१९' चे आयोजन केले. डॉ. व्ही. एन. ब्रीम्सचे अनेक माजी विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.



११ डिसेंबर: प्रा. कृणाल पुंजानी यांनी डिझाईन थिंकिंग या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन केले.

डिझाईन थिंकिंग या विषयाचे प्रख्यात सल्लागार व प्रशिक्षक डॉ. कौस्तुभ धारगलकर यांनी या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



११ डिसेंबर : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि प्रा. दीप्ती पेरिवाल; पीजीडीएम आणि एमएमएसच्या विद्यार्थ्यांसह एन. एस. ई. तर्फे आयोजित इंडियन फायनान्शियल मार्केट्स २०१९ या परिषदेमध्ये सहभागी झाल्या.



१३ डिसेंबर : डॉ. व्ही. एन. ब्रीम्सच्या विद्यार्थ्यांनी 'युसेन लॉजिस्टिकला' शैक्षणिक भेट दिली.

डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि डॉ. पल्लवी चांदवसकर यांनी ब्रीम्स कनेक्ट या कार्यक्रमाचे आयोजन केले.



१६ डिसेंबर : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि प्रा. कंचन अक्षय यांच्यासमवेत डॉ. व्ही. एन. ब्रीम्सच्या विद्यार्थी पथकाने सी. आय. आय. तर्फे आयोजित 'द इंडिया वुई वॉन्ट' या विषयावरील राष्ट्रीय वादविवाद स्पर्धेत भाग घेतला.



डॉ. व्ही. एन. ब्रीम्सच्या रोजगार नियुक्ती विभागाच्या (प्लेसमेंट टीम) वतीने 'टॉपर टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड'च्या कॅम्पस रिक्रूटमेंटचे आयोजन करण्यात आले.



२० डिसेंबर : प्रा. दीप्ती पेरिवाल यांनी पीजीडीएमच्या विद्यार्थ्यांसह बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (बीएसई) आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला शैक्षणिक भेट दिली.



२० डिसेंबर: आय.आय. व एम. आय. समितीच्या कार्याचा एक भाग म्हणून प्रा. कृणाल के पुंजनी यांनी 'नॅशनल इनोव्हेशन अँड स्टार्ट-अप पॉलिसी' (एनआयएसपी) वर कार्यशाळा आयोजित केली.



२१ डिसेंबर: प्रा. कांचन व प्रा.सिद्धेश यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी समिती तर्फे क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



२३ डिसेंबर : डॉ. व्ही. एन. ब्रीम्सच्या रोजगार नियुक्ती विभागा (प्लेसमेंट टीम) तर्फे एचडीएफसी लाइफ या कंपनीसाठी कॅम्पस रिक्रूटमेंट ड्राइव्ह घेण्यात आला, ज्यामध्ये आमच्या सहा विद्यार्थ्यांची निवड झाली.



डॉ. पल्लवी चांदवसकर यांनी एमएमएस आणि पीजीडीएम प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी उद्योजकता आणि प्रेरणा या विषयावर ट्रेनर असोसिएशन ऑफ इंडिया मधील तज्ज्ञांच्या व्याख्यानाचे आयोजन केले.



२६ डिसेंबर : लर्नएक्स तर्फे डॉ. व्ही. एन. ब्रीम्समध्ये केस स्टडी विश्लेषण स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत १० संघांनी भाग घेतला. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी केले.



३० डिसेंबर : प्रा. विभूती सावे आणि प्रा. दीप्ती पेरीवाल यांनी आय.आय.टी. बॉम्बे एक्सचे ऑनलाइन कार्यशाळेंचे सौर अभ्यास-दीप जोडणी (असेंब्ली) प्रशिक्षण पूर्ण केले.

३० डिसेंबर : संगीताच्या प्रतिभेला उत्तेजन देण्यासाठी डॉ. व्ही. एन. ब्रीम्सने स्वरांजली या कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रा. महेश भानुशाली यांनी गायन, प्रा. विभूती

कोणी पुसणार असेल तर डोळे भरून यायला अर्थ असतो. परंतु कोणाचेही डोळे ओले होणार नसतील तर मरणसुद्धा व्यर्थ असते.

सावे यांनी कविता, डॉ. नीतिन जोशी यांनी गायन, तबला वादन, माऊथ ऑर्गन वादन, प्रा. किरण परांजपे यांनी माऊथ ऑर्गन वादन, प्रा. सिद्धेश सोमण यांनी गिटार वादन, विद्यार्थिनी प्रशंसा अडाकणे हिने गायन, विद्यार्थिनी सिद्धा कुलकर्णी हिने व्हायोलिन वादन आणि विद्यार्थी अवधूत घेवडेकर याने तबला वादन अशा विविध कलांचे सादरीकरण या कार्यक्रमात करण्यात आले. सूत्रसंचालनाची जबाबदारी ग्रंथपाल संजय सपकाळ आणि प्रा. संदीप मोघे यांनी पार पडली. तर कार्यक्रमाचे संयोजन डॉ. मीनाक्षी मल्होत्रा व प्रा. कंचन अक्षय यांनी केले.





ब्रिम्स कनेक्ट मासिकाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला.

प्रा. संदीप मोघे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाकरीता शिक्षकांसाठी गुगल क्लासरूम सत्र आयोजित केले.

प्रा. कुणाल के. पुंजनी यांनी यूजीसी नेट परीक्षा – डिसेंबर, २०१९ उत्तीर्ण केली.

•••

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

अध्यापनात उपयोग करत असत. त्यामुळे त्यांचे गणिताचे तास कंटाळवाणे न होता मनोरंजक होत असत. 'मनोरंजक गणिताचे प्रणेते' असे आपण त्यांना म्हणू शकतो. त्यांच्या गणितातील हुशारीमुळे कापरेकर सरांना त्यांचे सहकारी आदर देत असत. परंतु त्यांच्या कामाला देशात फारशी प्रसिद्धी मिळाली नाही. ते प्रकाशझोतात आले ते सायंटिफिक अमेरिकन या नियतकालिकात १९७५ साली आलेल्या लेखामुळे. मार्टिन गार्डनर नावाचे एक अमेरिकन गृहस्थ या नियतकालिकात 'खेळ गणिताचे' अशा मथळ्याखाली एक सदर चालवित होते. त्यांनी या सदरात कापरेकरांनी जे मनोरंजक गणित विकसित केले त्याची माहिती दिली. हे नियतकालिक जगभर जाते. त्यामुळे कापरेकरांच्या कामाचा सर्वत्र गवगवा झाला.

गणित हा विषय शाळेतील बऱ्याच विद्यार्थ्यांना कंटाळवाणा वाटतो. शालांत परीक्षेत या विषयात नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असते. हे टाळण्यासाठी गणित मनोरंजक करणे आवश्यक आहे. याचा सहज साध्य असा मार्ग कापरेकर सरांनी आपल्याला दाखविला आहे. त्यांच्या मार्गाचा अवलंब केल्यास गणित शिक्षणाचे कार्य सुकर आणि प्रभावी होईल असा विश्वास वाटतो. त्यांच्या ११५ व्या जयंतीनिमित्त आपण त्यांना अभिवादन करू या आणि त्यांनी दाखविलेल्या मार्गावर जाण्याचा प्रयत्न करू या.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.